म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. १२२


REFBK-0004046
REFBK-0004046

# सातारा जिल्ह्याचे भूवर्णन

ले: बागल, बा. रा.

प्रका: बा. रा. बागल, भिवंडी.

सन १८२८ कि. १८ पै.


जिल्हा सातारा
राजकीय विभाग
महाबळेश्वर
वाई
पाचगणी
सातारा
कोरेगांव
दहिवडी
वडूज
पाटण
फलटण
आटपाडी
विटे
तासगांव
सांगली
मिरज
KAD

# लेखकाचे दोन शब्द.

आपण ज्या जिल्ह्यांत राहतों त्या जिल्ह्याशीं आपला पुष्कळ
ाकारचा संबंध येतो. व्यापार, जाणेंयेणें, पत्रव्यवहार वगैरे प्रकारां-
करतां जिल्ह्याची माहिती असणें जरूर आहे. शाळेंत इयत्ता
३ री मध्यें जिल्ह्याची माहिती दिली जाते. आजपर्यंत जिल्ह्याची
चांगली व पद्धतशीर माहिती असलेलें पुस्तक लिहिलें गेलें नाहीं.
ल्या वर्षी आम्ही जिल्ह्याच्या भूगोलाचें पुस्तक तयार केलें होतें.
ण त्याच्या प्रति खलास झाल्यामुळें पुन्हां त्यांतच सुधारणा
करून आज हें नवें पुस्तक तयार केलें आहे. या पुस्तकांत
ामान्य वर्णन व विशेष वर्णन असे दोन भाग असून त्या प्रत्येकाचे
ुका तासाला शिकविण्यास पुरे होतील असे पाठ ( भाग ) पाडले
आहेत. एकंदर भाग ३८ असून वर्षांत सर्व विषय शिकवून व्हावा
ा याचा हेतु आहे. सामान्य वर्णनाचे स्पष्टीकरणासाठीं आराखडे
ातले आहेत. इयत्ता २ रीमध्यें जरूर त्या बहुतेक व्याख्या होत
ासल्यामुळें या पुस्तकांत त्या दिल्या नाहींत.

पुस्तक लिहिण्याचे कामीं मे० गणपतराव घुले, बी. ए. यांनीं
लिहिलेल्या ‘ अहमदनगर जिल्ह्याच्या भूगोलाचे पाठ ’ या पुस्त-
काचा फार उपयोग झाला. तसेंच माझे परमपूज्य गुरुवर्य कृष्णराव
ाऊराव बाबर उर्फ अण्णासाहेब यांनीं जिल्ह्यासंबंधीं पुष्कळ
ाहिती दिली व हस्तप्रत वाचून योग्य त्या सुधारणा करवून
स्तक शक्य तितकें निर्दोष करविण्याची कृपा केली याबद्दल
० घुले व गु० अण्णासाहेब यांचा लेखक फार ऋणी आहे.

किर्लोस्करवाडीचे श्री० देसाई यांनीं ब्लॉक वेळेवर करून दिल्याबद्दल व मि. जोगळ व पेणकर यांनीं ब्लॉकचे बाबतींत मदत केल्याबद्दल तसेंच हनुमान प्रेसचे मालक श्री. लक्ष्मणराव कोकाटे यांनीं ताबडतोब पुस्तक छापून दिल्याबद्दल आणि माझे मित्र श्री. सखाराम ज्ञानोजीराव फडतरे यांनीं प्रुफें तपासल्याबद्दल मी ह्या सर्वांचा फार आभारी आहें.

पहिली आवृत्ति खपविण्याचे कामीं ज्या ज्या मित्रांनीं मदत केली त्यांचे आभार मानून मी हे दोन शब्द पुरे करतों.

| | |
|---|---|
| सन १९२९ शिवराज शक १८५५ | आपला नम्र, |
| भिलवडी, जि. सातारा. | बाबूराव रामराव बागल. |

संग्रह

# पाठ १ ला.

## विभाग, सीमा, आकार व विस्तार.

( सातारा जिल्ह्याचा नकाशा लावून ) हा पहा नवा नकाशा. यांत आपला तालुका कोणता तो पहा. आपल्या तालुक्याचा रंग कोणता आहे ? तालुके निरनिराळे ओळखतां यावेत म्हणून त्यांना ३।४ प्रकारचे रंग दिले आहेत. निरनिराळ्या प्रत्येक रंगाचा एक भाग तालुका आहे. असे भाग या नकाशांत १० आहेत. १००-१२५ गांवें एकत्र करून कामाच्या सोईसाठीं त्याचा तालुका करतात; तसेंच ८ पासून १२ पर्यंत तालुके एकत्र करून एक जिल्हा तयार करतात. या नकाशाचे एका बाजूस ' सातारा ' जिल्ह्याचा नकाशा ' असें लिहिलें आहे. सातारा हा गांव पूर्वी मराठी राज्याची राजधानी होता. म्हणून अशा प्रसिद्ध गांवाचें नांव या जिल्ह्यास दिलें आहे. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण सातारा हें आहे. या जिल्ह्याचे १० विभाग म्हणजे तालुके आहेत. ते—**वाई, सातारा, कोरेगांव, खटाव, खानापूर, तासगांव, वाळवें, कऱ्हाड, पाटण, जावली** व **माण, शिराळें, मालकमपेठ** हे तीन पेटे आहेत. **फलटण** व **आटपाडी महाल** हे दोन पिवळ्या रंगानें दाखविलेले भाग आहेत ते संस्थानिकांच्या ताब्यांत आहेत. जिल्ह्यांत ठिकठिकाणीं पिवळ्या रंगाचा थोडाथोडा भाग दिसत आहे तोही निरनिराळ्या संस्थानिकांच्या ताब्यांत आहे.

( मुंबई इलाख्याचा नकाशा दाखवून ) ह्या नकाशांत आपला सातारा जिल्हा या ठिकाणीं आहे. याचे भोंवतालीं कोणकोणते जिल्हे आहेत ते पाहूं या. उत्तरेस, भोरसंस्थान व पुणें जिल्हा. पूर्वेस सोलापूर जिल्हा व जतसंस्थान. दक्षिणेस, कोल्हापूर, मिरज,

सांगली हीं संस्थानें. पश्चिमेस सह्यपर्वत व त्यापलीकडे कुलाबा व रत्नागिरी हे जिल्हे.

सातारा जिल्ह्याच्या उत्तर सरहद्दीवरून निरा नदी व दक्षिण सरहद्दीवरून वारणा नदी वाहते. पश्चिम सरहद्दीवर सह्यपर्वताची रांग आहे. फक्त पूर्व सरहद्द स्वाभाविक नाहीं.

नकाशांत पाहिल्यास जिल्ह्याचा आकार चौकोनी आहे असें दिसून येईल. जिल्ह्याचें स्केल दिलें आहे त्यावरून प्रत्यक्ष मोजून आपण जिल्ह्याची लांबीरुंदी ठरवूं या. पूर्वपश्चिम अंतरापेक्षां दक्षिणोत्तर अंतर जास्त आहे. जें अंतर जास्त त्यालाच लांबी म्हणतात व जें कमी त्याला रुंदी म्हणतात. दक्षिणोत्तर लांबी १०० मैल व पूर्वपश्चिम रुंदी ८० मैल आहे.

---

# पाठ २ रा.

## स्वाभाविक रचना व विभाग.

मुलांनो, आपण आपल्या गांवांतील उंच ठिकाणीं उभे राहून आसपास पाहूं लागलों तर, भोंवतालची सर्व जमीन सपाट दिसत नाहीं. ठिकठिकाणीं चढउतार असलेला दिसेल. लांबवर पाहिल्यास डोंगर दिसतील. डोंगर हा जमिनीवरील मोठा उंचवटा आहे. हा चढउतार, डोंगर हे मनुष्याला उत्पन्न करतां येत नाहींत. हे ईश्वरानें तयार केलेले असतात म्हणून याला स्वाभाविक म्हणजे ईश्वरानें उत्पन्न केलेली, रचना असें म्हणतात. स्वाभाविक रचनेंत उंची व उतार तसेंच सखल व सपाट प्रदेश यांचा समावेश होतो.

उठाव दाखविणाऱ्या नकाशांत पाहिल्यास सर्वांत उंच भाग पश्चिमेकडे व विशेषतः वायव्येकडे असल्याचें दिसेल. पूर्वेकडे व दक्षिणेकडे उंचवटा कमी कमी होत गेला आहे. नद्या उतरत्या

भागाकडे वाहात जातात. उठाव दाखविणाऱ्या नकाशांत नद्या दाखविल्या आहेत; त्यावरून जिल्ह्याचा उतार आग्नेयीकडे आहे हें सहज समजेल. सह्यपर्वत जिल्ह्याच्या पश्चिमभागीं दक्षिणोत्तर आहे. जिल्ह्याच्या मध्यभागीं डोंगरांची दक्षिणोत्तर रांग आहे. या रांगेच्या पूर्वभागीं डोंगर फार कमी आहेत. प्रदेश बहुतेक सपाट आहे. या रांगेच्या पश्चिमेस व पश्चिमेकडील रांगेच्या पूर्वेस जो भाग आहे त्यांत डोंगर बरेच आहेत. तसेच सपाट जमीनही पुष्कळ आहे. यावरून जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात.

१. **पश्चिमेकडील डोंगराळ भाग किंवा पश्चिमपट्टा**—या भागांत डोंगर फार आहेत. वाई, सातारा या तालुक्यांचा पश्चिमभाग व जावळी, पाटण व शिराळे पेटा यांतील सर्व भाग या पश्चिमपट्ट्यांत येतात. हा फार डोंगराळ असल्यामुळें सपाट जमीन थोडी आहे. मात्र बऱ्याच डोंगरांच्या माथ्यावर सपाट जमीन आहे. अशा सपाट जमिनीस पठार म्हणतात. या भागांतून पुष्कळ नद्या उगम पावल्या आहेत. नद्यांकडे पाहिल्यास दोन्ही बाजूंस डोंगरांची रांग असून त्यांमधून नदी वाहात आहे असें दिसतें. हे दोन्ही डोंगर प्रथम एकमेकांजवळून निघाले असून पुढें एकमेकांपासून लांब गेलेले आहेत; त्यामुळें त्यांमधला प्रदेश आरंभीं चिंचोळा असून पुढें पुढें रुंदरुंद होत गेला आहे. अशा भागांस खोरें म्हणतात. जी नदी त्यांतून वाहाते, तिचें नांव त्या खोऱ्याला देतात. दोन डोंगरांमध्यें असणाऱ्या अरुंद फटीस खिंड म्हणतात. हा डोंगराळ भाग सुमारें २०।२५ मैल रुंद असून समुद्राच्या सपाटीपासून त्याची उंची सुमारें पाऊण मैल आहे. महाबळेश्वर हा यांतील सर्वांत उंच भाग आहे.

२. **मध्यपट्टा**—या भागाच्या उत्तरभागीं डोंगर बरेच असून दक्षिणे-

कडे कमी होत गेले आहेत. डोंगर कमी असल्यामुळें सपाट जमीन पुष्कळ आहे. जिल्ह्याच्या सर्व भागापेक्षां हा भाग जास्त पिकाऊ आहे. या भागांतून कृष्णा नदी वाहते. भागाची रुंदी सुमारें २०।२२ मैल असून समुद्रसपाटीपासून उंची अर्धा मैलापेक्षां कमी आहे. उतार दक्षिणेकडे आहे.

३. पूर्वपट्टा—या भागांत डोंगर फार कमी आहेत. तरीपण उत्तरेच्या बाजूस बराच डोंगराळ प्रदेश आहे. ह्या भागीं सपाट जमीन फार आहे; पण तीमध्यें माळरान फार आहे. या भागाची रुंदी २०।३५ मैल असून उंची मध्यपट्ट्यापेक्षां थोडी जास्त आहे. उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. शंभूमहादेवाच्या डोंगरांच्या रांगेच्या उत्तरेकडील भागही यांत येतो.

---

## पाठ ३ रा.

### पर्वत व डोंगर.

जिल्ह्याच्या पश्चिमभागीं सर्वांत उंच अशी सह्यपर्वताची रांग आहे. या रांगेंतील सर्वांत उंच भाग महाबळेश्वर आहे. या पर्वतापासून डोंगरांचे पुष्कळसे फाटे निघाले असून ते जिल्ह्याच्या सर्व भागांत पसरले आहेत. सह्याद्रि व त्याचे फाटे यांवर पूर्वींच्या राजे लोकांनीं शत्रूपासून संरक्षण होण्यासाठीं किल्ले बांधले आहेत. डोंगरावरील किल्ल्यांस डोंगरी किल्ले म्हणतात. सह्याद्रीपासून निघालेले फाटे पांच आहेत. ते—

( १ ) **महाबळेश्वर वैराटगड फाटा**—या फाट्यांत पांचगणी हें ठिकाण असून वैराटगड हा डोंगरी किल्ला आहे. या फाट्याच्या पुढच्या भागास पांचगणीचा डोंगर असें म्हणतात.

( २ ) **महाबळेश्वर आरळे फाटा**—महाबळेश्वरापासून

आरळ्यापर्यंत आहे. यांत मेरूलिंगाचा डोंगर आहे. याच्या उत्तर बाजूनें कुडाळी व दक्षिण बाजूनें वेण्णा या नद्या वाहतात.

( ३ ) महाबळेश्वर दातेगड फाटा—हा दक्षिणोत्तर लांबवर पसरला आहे. याचे शेवटीं दातेगड हा डोंगरी किल्ला आहे. या फाट्यास तीन रांगा फुटून त्या पूर्वेकडे गेल्या आहेत. ( १ ) यवतेश्वराचा डोंगर, यांत शेवटीं साताराचा किल्ला आहे. ( २ ) परळीचा डोंगर, यांत सज्जनगड किल्ला आहे. ( ३ ) मेंढोशीचा डोंगर यांत शेवटीं वसंतगड किल्ला आहे.



( ४ ) **बहिरवगड गोटखिंडी फाटा**—बहिरवगडापासून गोट खिंडीपर्यंत या फाट्याचे डोंगर पसरले आहेत.

( ५ ) **शंभूमहादेवाचे डोंगराचा फाटा**—महाबळेश्वराच्या उत्तर बाजूनें या फाट्यास सुरवात होऊन पूर्वेकडे गेला आहे. हा फाटा पुष्कळ लांब असल्यामुळें त्याला ठिकठिकाणीं हरळीचा डोंगर, ह्मसकोबाचा डोंगर, सीताबाईचा डोंगर अशीं नांवें आहेत. याला तीन रांगा फुटून दक्षिणेकडे गेल्या आहेत. याचे शेवटीं शंभूमहादेवाचें स्थान आहे.

( १ ) **चंदनवंदन रांग**—ही रांग जरंड्याच्या डोंगरा-पर्यंत गेली आहे. या रांगेंत चंदनवंदन हे डोंगरी किल्ले आहेत.

( २ ) **वर्धनगड सदाशिवगड रांग**—ही कुंडलपर्यंत गेली आहे. या रांगेंत वर्धनगड भूषणगड, व सदाशिवगड हे डोंगरी किल्ले आहेत. ही रांग कोरेगांव, कऱ्हाड, खटाव, खानापूर या तालुक्यांच्या सरहद्दीवरून गेली आहे.

( ३ ) **ताथवडा महिमानगड रांग**—ही नागजपर्यंत गेली आहे. या रांगेंत ताथवडा, वारूगड, महिमानगड हे डोंगरी किल्ले आहेत.

या जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगरांवर झाडी पुष्कळ आहे. मोठीं मोठीं जंगलें व कुरणें आहेत. पूर्व बाजूस झाडी कमी होत गेली आहे. मध्यपट्ट्यांतील डोंगरांवर झाडी बरीच आहे. चराऊ रानही चांगलें आहे. पूर्व पट्ट्यांतील डोंगरांवर झाडी फार कमी आहे. कांहीं कांहीं डोंगरांवर झाडें मुळींच नाहींत, त्यामुळें ते फार रखरखीत दिसतात. गवत चांगलें वाढत नसल्यामुळें चराऊ रान म्हणूनही त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं.

# पाठ ४ था.

## हवामान.

सपाट जमिनीवरून टेकडीवर गेल्यास आपणाला सपाट जमिनीवरील हवेपेक्षां टेकडीवरील हवा कमी उष्ण असल्याचें समजून येईल, व टेकडीवरील हवेपेक्षां डोंगरावरील हवा कमी उष्ण असते. यावरून जों जों प्रदेश जास्त जास्त उंच असतो तों तों त्यावरील हवा कमी उष्ण होत जाते.

सातारा जिल्ह्याचा पश्चिमपट्टा इतर भागापेक्षां उंच आहे म्हणून यांतील हवा इतर भागापेक्षां कमी उष्ण असते. शिवाय या भागांत झाडी फार आहे. झाडांमुळें हवेंत गारवा राहतो. म्हणून पश्चिमपट्ट्यांतील हवा थंड असल्याचें दिसून येईल. या पट्ट्यांतच महाबळेश्वर हें थंड हवेचें ठिकाण आहे. या ठिकाणीं श्रीमंत लोक उन्हाळ्याचे दिवसांत हवा खाण्यास जातात.

जिल्ह्याच्या मध्यपट्ट्यांत पश्चिमपट्ट्यापेक्षां डोंगर पुष्कळ कमी आहेत. याशिवाय झाडीही तितकी नाहीं, त्यामुळें यांतील हवा त्या भागापेक्षां उष्ण आहे.

पूर्वपट्टा सपाट आहे त्यांत डोंगर फार कमी आहेत. झाडीही कमी आहे, याशिवाय माळरान जास्त असल्यामुळें तें सूर्याचे उष्णतेनें तापतें व तें तापलें म्हणजे हवाही तापते. म्हणून हा पट्टा मध्यपट्ट्यापेक्षां उंच असूनही यांतील हवा वरील दोन्ही पट्ट्यांपेक्षां जास्त उष्ण असते.

यावरून जिल्ह्याच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे हवा जास्त जास्त उष्ण असते हें समजलेंच असेल.

हवा जों जों कमी उष्ण तों तों त्या हवेंत काम करणाऱ्या

मनुष्यांस हुशारी येते, व थकवा लवकर येत नाहीं. पण हवा जों जों जास्त उष्ण तों तों त्या हवेंत काम करण्यास मनुष्याला कंटाळा येतो; व काम करूं लागलाच तर थकवा लवकर येतो. या दृष्टीनें पाहिल्यास पश्चिम भागांतील माणसांस उद्योग करण्यास हुशारी वाटते व त्यांना लवकर थकवा येत नाहीं. पण पूर्व भागांत काम करण्यास आळस येतो व लवकर थकवाही येतो.

थंडीचे दिवसांत म्हणजे कार्तिक महिन्यापासून माघ महिना अखेरपर्यंत हवा चांगली हुशारी देणारी असते. या दिवसांत ऊन कमी असून हवा गारठ्याची असते. या दिवसांत काम करण्यास हुरूप येतो व खाल्लेलें सर्व पचतें. पण उन्हाळ्यांत म्हणजे फाल्गुन महिन्यापासून ज्येष्ठ महिन्यापर्यंत उन्हाळा असतो. या दिवसांत ऊन फार कडक पडतें व हवेंत उष्णता व उकाडा फार वाढतो, त्यामुळें काम करण्यास हुरूप वाटत नाहीं. दुपारीं तर बहुतेक लोक उन्हांत जातही नाहींत. आळस व सुस्ती फार वाढते. नंतर पुढें पावसाळा सुरूं होतो. पावसामुळें हवेंतील उष्णता कमी होते व काम करण्यास मनुष्यांना उमेद येते. उन्हाळ्यापेक्षां पावसाळा काम करण्याच्या दृष्टीनें चांगला. पावसाळा जेष्ठापासून आश्वीन अखेर असतो.

---

## पाठ ५ वा.

### पाऊस.


नद्या, ओढे, तळीं, विहिरी या सर्वांना पावसापासून पाणी मिळतें. पाऊस आकाशांत ढग येऊन त्यांतून पडतो. आकाशांत हे ढग कोठून येतात व कसे तयार होतात, तें पाहूं—

चुलीवर पाणी तापत ठेवलें म्हणजे कांहीं वेळानें त्या पाण्याची वाफ होऊं लागते. पाण्याखालीं जो जाळ लावलेला असतो त्याच्या उष्णतेनें पाण्याची वाफ होते. त्याप्रमाणेंच सूर्याच्या उष्णतेनें नदी, ओढे, तळीं, समुद्र यांतील पाण्याची वाफ होते. वाफ हवेपेक्षां हलकी असल्यामुळें ती हवेंत वर जाते. वाफेपासून ढग तयार होण्यास हवेंत पुष्कळ वाफ सांचावी लागते. पुष्कळ वाफ पाहिजे असल्यास पाण्याचा सांठा मोठा पाहिजे म्हणून समुद्रावर पुष्कळ वाफ सांचते व त्याठिकाणीं ढग बनतात.

आपल्या देशाचा नकाशा पाहिल्यास त्यांत आपल्या जिल्ह्याच्या पश्चिमेला कांहीं अंतरावर अरबी समुद्र व पूर्वेस पुष्कळ अंतरावर बंगालचा समुद्र दिसत आहे. या समुद्रावर वाफेपासून ढग तयार होतात. हेच ढग आपणांकडे येऊन पाऊस पडतो

दरसाल वैशाख महिन्यापासून अरबी समुद्रावरून आपणांकडे जोराचा वारा वाहूं लागतो. वाऱ्याच्या जोरामुळें समुद्रावरील बनलेले वाफेचे ढग आपणांकडे येतात. ढग येऊं लागल्यावर प्रथम त्यांना सह्यपर्वत लागतो. सह्याद्रीवरील हवा थंड आहे. पाण्याच्या वाफेला थंड हवा लागूं लागली म्हणजे तिचें पाणी होतें. म्हणून सह्याद्रीवर ढगांचें पाणी होऊन तें पावसाच्या रूपानें पडतें. पश्चिम पट्ट्यांत उंचउंच डोंगर फार आहेत व त्यांतील हवा कमी उष्ण असल्यानें त्यांत पाऊस फार पडतो. नंतर ते ढग पूर्वेकडे जाऊं लागतात. प्रथम मध्यपट्टा लागतो पण यांत डोंगर कमी व हवा पश्चिमपट्ट्यापेक्षां जास्त उष्ण म्हणून ढगांचें पाणी होण्यास फारसी मदत होत नाहीं या कारणानें या पट्ट्यांत पश्चिम पट्ट्यापेक्षां पाऊस कमी पडतो. पूर्वपट्ट्यांत डोंगर फार कमी व हवा जास्त उष्ण म्हणून पाऊस कमी पडतो, अगदीं पूर्वेकडे पाऊस बहुतेक पडतच नाहीं. पश्चिमेकडून येणारा पाऊस पश्चिमभागीं जास्त व तेथून पूर्वे-

कडे कमी कमी पडत जातो. हा पाऊस निम्या भाद्रपदापर्यंत असतो.




भाद्रपद-आश्वीन महिन्यांत पूर्वेकडून-बंगालच्या उपसागरावरून-वारे वाहू लागतात. हे वारे तिकडील ढग इकडे आणतात पण ते लांबून आल्यामुळें त्यापासून आपणाकडे पश्चिमेकडून येणाऱ्या पावसाइतका पाऊस पडत नाहीं. तथापि हा पाऊस पूर्वेकडील पट्ट्यांत बराच पडतो व पश्चिमेकडे कमी कमी पडत जातो. या पावसास वळिवाचा पाऊस म्हणतात. पूर्वपट्ट्याचें पीकपाणी यावरच अवलंबून आहे. मध्यपट्ट्यास ह्या पावसाची फार जरूरी लागते. पश्चिमे-

कडून येणारा पाऊस कांहीं दिवस एकसारखा लागून राहतो. त्याचे थेंब लहान असतात पण वळिवाचा पाऊस तसा एकसारखा कांहीं दिवस लागून न राहतां थोडा वेळच येतो पण तो फार जोराचा येतो. त्याचे थेंबही फार मोठे असतात. जिल्ह्याच्या पश्चिम आंगास पश्चिमेकडील पावसानें व पूर्वांगास वळीवाचे पावसानें जास्त पाणी मिळतें.

सपाट जमिनीवर पाऊस पडला आणि तें पाणी वाहून गेलें नाहीं, जमिनींत जिरलें नाहीं किंवा त्याची वाफ झाली नाहीं तर जितकें खोल पाणी सांचेल तितका पाऊस पडला असें समजावें. ज्याचें तोंड, मधला भाग व बूड सारख्याच आकाराचें आहे असें भांडें अथवा राकेलतेलाचा तोंड कापलेला डबा घेऊन तो पावसाचें पाणी पडेल अशा उघड्या जागीं ठेवावा. नंतर त्यांतील पाणी इंच पट्टीनें मोजून जितके इंच पाणी खोल भरेल तितके इंच पाऊस पडला असें समजतात. एका वर्षांत सह्याद्रीवर सुमारें २०० इंच, महाबळेश्वरावर २५० ते ३०० इंच, मध्यपट्ट्यांत २० ते ३५ इंच व पूर्वपट्ट्यांत १० ते २० इंच पडतो.

---

# पाठ ६ वा.

—:o:—

## नद्या.

पावसाचें पाणी कांहीं जमिनींत जिरतें, कांहीं डबकीं व खोलगट भाग यांत सांठून राहतें व कांहीं वाहून जातें. डोंगरावर पडलेलें पाणी अशाच प्रकारें जिरतें, सांचून राहतें व वाहून जातें. जिरलेलें पाणी पुढें झऱ्याच्या रूपानें बाहेर पडतें. वाहून जाणारें पाणी प्रथम लहान ओहोळांतून वाहतें. हे ओहोळ एकमेकांस मिळून त्यांचा ओढा बनतो व असे ओढे एकमेकांस मिळून नदी बनते. आपल्या जिल्ह्यांत नद्या पुष्कळ आहेत. पश्चिमार्धांत

पावसाचें मान जास्त असल्यामुळें त्यांत नद्या जास्त आहेत व पूर्वार्धांत पाऊस कमी असल्यामुळें त्यांत नद्या कमी आहेत. जिल्ह्यांत कृष्णा नदी सर्वांत मोठी असून तींतून जिल्ह्यांत पडणारें बहुतेक सर्व पाणी वाहतें म्हणून या जिल्ह्यास कृष्णेचें खोरें म्हणण्यास हरकत नाहीं. उत्तर सरहद्दीवरील निरा व माणपेट्यांतील माणगंगा यांचेमधून वाहणारें पाणी कृष्णेंत सामील होत नाहीं. या जिल्ह्यांतील नद्यांचे तीन गट करतां येतील. (१) कृष्णा व तिला मिळणाऱ्या नद्या, (२) माणगंगा, (३) निरा. (चित्र नं.१ पहा.)

**कृष्णानदी**—सातारा जिल्ह्याच्या मध्यांतून वाहणारी जी मोठी नदी दिसत आहे ती कृष्णा नदी होय. ही जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यांत महाबळेश्वराचे डोंगरांत उगम पावून आग्नेयीकडे वाहात गेली आहे. या नदीस हिंदु लोक पवित्र मानतात. म्हणून हिच्या कांठीं पवित्र क्षेत्रें पुष्कळ आहेत. पावसाळ्यांत नदीस भरपूर पाणी असल्यामुळें लोक नदी ओलांडून जाण्यास नावांचा उपयोग करतात. बऱ्याच ठिकाणीं मोठ्या रस्त्यावर पूल आहेत. वाई, भुईंज, अतीत, क्षेत्र माहुली या ठिकाणीं पूल आहेत. कृष्णा--कांठ जिल्ह्यांत जास्त सुपीक आहे. हिला खोडशी येथें धरण धरून शेतीस पाणी पुरविलें आहे. कृष्णेला उजवीकडून—कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, उत्तर मांड, कोयना, वांग, दक्षिण मांड व वारणा या नद्या मिळतात, व डावीकडून वळकी, वसना व येरळा या नद्या मिळतात. कृष्णेचें पाणी स्नान करण्यास उत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. ही मच्छलीपट्टणजवळ बंगालचे उपसागरास मिळते.

**कुडाळी**— पांचगणीजवळ उगम पावून उडतऱ्याजवळ कृष्णेस मिळते.

**वेण्णा**—महाबळेश्वराचे डोंगरांत उगम पावून जावळी व सातारा या तालुक्यांतून वाहात जाऊन संगममाहुलीजवळ कृष्णेस मिळते.

उरमोडी—यवतेश्वराचे डोंगरांत उगम पावून काशीळ कोपऱ्याजवळ कृष्णेस मिळते.

तारळी—परळीचे डोंगरांत उगम पावून कोटीं गांवाजवळ कृष्णेस मिळते.

कोयना—महाबळेश्वराचे डोंगरांत प्रतापगडाजवळ उगम पावून जावळी, पाटण, कऱ्हाड या तालुक्यांतून वाहात जाऊन कऱ्हाड-जवळ समोरून येऊन कृष्णेस मिळते. या संगमास प्रीतिसंगम म्हणतात. संगमाजवळचें ठिकाण पवित्र मानून पुष्कळ लोक स्नानासाठीं तेथें जातात. हिला उजवीकडून कांदाटी, मोरणा, वांग या नद्या व डावीकडून सोळशी, केरा या नद्या मिळतात. या नदींतून कृष्णानदीइतकें पाणी वाहातें.

उत्तरमांड—मेंढोशीच्या डोंगरांत उगम पावून चाफळ खोऱ्यांतून वाहात जाऊन उंब्रजजवळ कृष्णेस मिळते.

दक्षिणमांड—कऱ्हाड तालुक्याच्या नैऋत्य कोपऱ्यांत उगम पावून कृष्णेस मिळते.

वारणा—सह्याद्रीचे डोंगरांत प्रचीतगड किल्ल्याजवळ उगम पावून जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवरून वाहत जाऊन हरिहर-जवळ कृष्णेस मिळते. हिला मांगल्याजवळ मोरणा नदी मिळते.

वसना—शंभूमहादेवाचे ओळींतील हरळीचे डोंगरांत उगम पावून मंगळापुराजवळ कृष्णेस मिळते. हिला वांगना नदी ल्हासुर्ण्याजवळ मिळते. वसनेस रेवडी गांवाजवळ धरण धरून त्यांतील पाणी कोरेगांव तालुक्यांतील बऱ्याच गांवच्या शेतीस पुरविलें आहे.

येरळा—ह्मसकोबाचे डोंगरांत उगम पावून खटाव, खानापूर, तासगांव या तालुक्यांतून वाहात जाऊन कृष्णेस मिळते. हिला

नेर येथें तलाव व खातगूण येथें धरण धरून शेतीस पाणी पुरविलें आहे. हिला नान्नी नदी मिळते.

निरा— भोर संस्थानांत सह्याद्रीचे डोंगरांत उगम पावून जिल्ह्याचे उत्तर सरहद्दीवरून वाहात जाऊन नरसिंगपुराजवळ भीमा नदीस मिळते. भोर संस्थानांत भाटघर येथें वळवंडी नदीस मोठा तलाव धरून त्यांतून या नदींत पाणी आणून सोडिलें आहे, व या नदीला मध्यंतरी बंधारा घालून नदीच्या दोन्ही बाजूला पाटानें पाणी नेलें आहे. दक्षिण बाजूनें जाणारा पाट फार मोठा आ.) त्याचें काम सातारा जिल्ह्यांत संपलें आहे. पुढें चालू आहे. हा पाटी पंढरपुराजवळून मंगळवेढ्यास न्यावयाचा आहे. हिला फलटण संस्थानांतून बाणगंगा नदी येऊन मिळते. सातारा जिल्ह्यांत फक्त बाणगंगा नदी उत्तरवाहिनी आहे.

माणगंगा—सीतेच्या डोंगरांत उगम पावून माणपेटा व आटपाडीमहाल यांतून सोलापूर जिल्ह्यांत वाहात जाते. हिला बिदाल येथें बंधारा घालून तेथून पिंगळीचे तलावांत पाणी नेऊन सोडलें आहे व तेथून पाटानें शेतीस नेऊन पुरविलें आहे. राजेवाडी येथें मोठा तलाव धरला आहे. हा तलाव जिल्ह्यांतील सर्व तलावांपेक्षां क्षेत्रानें मोठा आहे. या तलावांतील पाणी सातारा जिल्ह्यांतील शेतीस मिळत नसून सोलापूर जिल्ह्यांतील शेतीस मिळतें. माणगंगेचें पाणी पिण्यास फार उत्तम आहे.

---

## पाठ ७ वा.

### जमीन.

उत्तम पीक येण्यास चांगल्या जमिनीची व पुरेशा पावसाची जरूरी असते. सर्व ठिकाणची जमीन एकसारखी असत नाहीं.

कांहीं ठिकाणीं जमिनीचा थर खोल असतो व कांहीं ठिकाणीं तसा असत नाहीं. कांहीं ठिकाणीं जमीन चिकण असते तर कांहीं ठिकाणीं भुसभुशीत असते. प्रथम जमीन कशी तयार होते तें पाहूं; व नंतर जिल्ह्यांतील जमीन कशा प्रकारची आहे तें ठरवूं.

पर्वत, डोंगर व टेकड्या यांवर पाऊस पडला म्हणजे पावसाचें पाणी उताराकडे वाहूं लागतें. या पाण्याबरोबर दगड, माती वगैरे वाहात येऊन ओढे, नाले, नद्या यांतून पुराबरोबर वाहूं लागतात. कांहीं माती, डोंगर, टेकडी यांच्या पायथ्याशीं सांचते. पाण्याची ओढ या ठिकाणीं जास्त असल्यामुळें मातीचा थर फार जाड बसत नाहीं. जो गाळ नद्यांबरोबर वाहात जातो तो त्यांच्या दोन्ही कांठाला सांचून राहतो. अशा रीतीनें गाळ सांचून नदी-कांठीं जमिनीचा थर पुष्कळ जाड होतो. नदी किंवा ओढा यांच्या कांठीं तयार झालेल्या जमिनीस **मळईची जमीन** म्हणतात.

अशा प्रकारें डोंगरावरील माती वाहून गेल्यामुळें त्या ठिकाणीं जमिनीचा थर कमी होत जातो. सपाट जमिनीवरील माती वाहून जात नाहीं. म्हणून त्या ठिकाणचा मातीचा थर बहुतकरून कायम राहतो.

पश्चिमपट्ट्यांत डोंगर फार असल्यामुळें व तेथें पाऊस फार पडत असल्यामुळें पाण्याबरोबर त्या ठिकाणची माती वाहून जाते. म्हणून त्या ठिकाणचा जमिनीचा थर जाड नाहीं. या पट्ट्याच्या-पूर्व अंगाकडील भागांत डोंगरांच्यामध्यें सपाट प्रदेश बरेच आहेत त्यांत जमिनीचा थर कांहींसा जाड आहे. या पट्ट्यांतील जमीन फार सकस नाहीं.

मध्यपट्ट्यांत डोंगर कमी असून सपाट जमीन फार आहे. यांतून पुष्कळशा नद्या वाहातात, म्हणून यांतील जमीन फार

सकस आहे. जिल्ह्यांत हाच पट्टा जास्त सुपीक आहे. यांत सर्व कृष्णाकांठ येतो.

पूर्वपट्ट्यांत डोंगर कमी आहेत व नद्याही कमी आहेत. यांतील नद्या व ओढे यांचे कांठचा मातीचा थर जाड आहे. इतर भाग बहुतेक माळरान असल्यामुळें त्या ठिकाणीं मातीच्या थराची जाडी फार कमी आहे. हा पट्टा मध्यम पिकाऊ आहे. यांतील माणपेटा जमिनीच्या बाबतींत कनिष्ठ दर्जाचा आहे. यांतील बहुतेक जमीन माळरान व करल आहे.

जमिनीचे प्रकार--

काळी—या जमिनीचा थर काळा असून ती खोल असते. ही चांगली सकस असून तींत उत्तम पिकें येतात. अशी जमीन कृष्णेच्या आसपासच्या म्हणजे मध्यपट्ट्यांत व पूर्व पट्ट्यांतील नद्या, ओढे यांच्या कांठची आहे.

तांबडी--पश्चिम पट्ट्यांतील जमीन तांबडी आहे.

माळरान, करल व पांढरी—पूर्व पट्ट्यांत अशी जमीन फार आहे.

---

# पाठ ८ वा.


---

## पिकें.

आपणांस खाण्यासाठीं जीं निरनिराळ्या प्रकारचीं धान्यें लागतात तीं उत्पन्न होण्यास जमीन व पाणी यांची जरूरी असते. आपल्या जिल्ह्यांतील पाऊस व जमीन यासंबंधींची माहिती तुम्हांस झाली आहेच. प्रत्येक पिकास जमीन निरनिराळ्या प्रकारची व पाऊस कमजास्त लागतो म्हणून जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांत वेगवेगळालीं पिकें होतात.

कांहीं पिकांची पेरणी पावसाळ्यास आरंभ झाल्यावर करतात, व दिपवाळीस कापणी करतात. अशा पिकांना खरिपाचीं पिकें म्हणतात, व कांहीं पिकें दिपवाळीचे अगोदर पेरतात व माघ फाल्गुन महिन्यांत काढतात, त्यांना रब्बीचीं पिकें म्हणतात.

आपल्या जिल्ह्यांत मुख्य पीक एक नसून प्रत्येक पट्ट्यांत निरनिराळीं पिकें मुख्य आहेत. पश्चिमपट्टींत तांदूळ, मध्यपट्टींत शाळू व जोंधळा आणि पूर्वपट्टींत बाजरी. तांदळाच्या पिकाला पाणी फार लागतें व पश्चिमपट्टींत पाऊस जास्त पडतो, म्हणून त्या भागांत तांदूळ होतो. पूर्व पट्टींत लोकांनीं ताली धरल्या आहेत.



तींत पाणी सांठून राहतें, म्हणून अशा ठिकाणीं तांदूळ करतात; पण अशा प्रकारें तांदूळ थोड्या ठिकाणीं होतो. पश्चिमपट्टींत तांदळा-शिवाय वरी, नाचणी, सावा, वाटाणा, बटाटा, घेवडा, पावटा, भुइ-मूग हीं पिकें होतात.

जोंधळ्याचे पिकास पाऊस बेताचा म्हणजे पिकापुरता लागतो व जमीन सकस लागते, म्हणून हें पीक मध्यपट्ट्यांत विशेषतः दक्षिणार्धांत जास्त होतें. उत्तरार्धांत शाळू फार होतो. शाळूलाही-जमीन सरस, काळी व पाऊस बेताचा लागतो. जोंधळा हें खरि-पाचें पीक असून शाळू हें रब्बीचें पीक आहे. याशिवाय या पट्टीच्या दक्षिणार्धांत भुइमुगाचें अतिशय पीक होतें. कापूस, तंबाखू यांचेंही उत्पन्न पुष्कळ आहे. तूर, मूग, मटकी, हरभरा, गहू, आलें, मका हीं पिकें थोडींफार होतात. उत्तरार्धांत बटाटा पुष्कळ होतो. कापूस व तंबाखू हीं पिकें इकडील लोक करीत नाहींत. बाकीचीं दक्षिणार्धातील इतर पिकें याही भागांत थोडींफार होतात.

बाजरीचे पिकास पाऊस बेताचा व जमीन कशाही प्रकारची असली तरी खपते, म्हणून हें पीक पूर्वपट्टींत फार होतें. शाळू, गहू, हरभरा, भुइमूग तूर, मूग, उडीद, मका, जोंधळा, करडी हीं पिकें कमजास्त मानानें होतात.

वर तिन्ही पट्ट्यांत जीं पिकें सांगितलेलीं आहेत तीं पावसाच्या पाण्यावर होतात. अशा पिकांना जिराईत पिकें म्हणतात व विहिरी, तलाव, धरण यांपासून पाणी देऊन जीं पिकें होतात त्यांना बागा-ईत पिकें म्हणतात. बागाईत पिकांना जमीन चांगली लागते. पश्चिम पट्टींत बागाईत पिकें होत नाहींत. मध्यपट्टींत—कराड, वाळवें तालुका यांत उसाचें उत्पन्न मोठें आहे. नागवेलीचीं ( विड्याचीं ) पानें कोरेगांव, कऱ्हाड, वाळवें या तालुक्यांत व हळद सर्व पट्ट्यांत

होते. हळदींत मका होते. वाई तालुक्यांत लोणंदचे आसपास कांदे फार होतात. पूर्वपट्टींत—खपली गहू जास्त होतो. इकडे पाऊस कमी पडत असल्यामुळें शाळू बागाईत जमिनींत होतो. कांदे, लसूण, रताळीं ( रताळीं माण तालुक्यांत जास्त होतात, व तीं चवदार असतात ), व्हंडी ( जोंधळ्याच्या जातीचें धान्य असून कमी कसदार असतें. हें आषाढांत काढावयास येतें. हें पीक माण तालुक्यांत होतें ), मका, गाजरें. कांहीं ठिकाणीं बटाटा होतो.

एकंदरींत मध्यपट्टी पिकांच्या बाबतींत सरस असून पूर्वपट्टीचा नंबर तिचे खालीं आहे. पश्चिमपट्टी या दोहोंच्या खालीं आहे. जिल्ह्यांतील लोकांचें मुख्य अन्न—पश्चिमपट्टींत—तांदूळ, मध्यमपट्टींत जोंधळा व शाळू व पूर्वपट्टींत—बाजरी, शाळू व जोंधळा हें आहे.

---

# पाठ ९ वा.

## प्राणी, वनस्पति व खनिज पदार्थ.

ईश्वरानें मनुष्य, पशु, पक्षी इत्यादि प्रकारचे प्राणी उत्पन्न केले आहेत. मनुष्यप्राणी बुद्धिमान् असल्यामुळें तो इतर प्राण्यांना आपल्या ताब्यांत ठेवून किंवा दूर हांकून देऊन राहिला आहे. जीं जनावरें मनुष्यानें आपल्या उपयोगासाठीं पाळलीं आहेत त्यांना पाळीव जनावरें म्हणतात; व जीं मनुष्याच्या भीतीनें किंवा दुसऱ्याची ताबेदारी पत्करावयाची नाहीं या इच्छेनें रानावनांत राहिलीं आहेत, त्यांना रानटी जनावरें म्हणतात.

**रानटी जनावरें—पश्चिमपट्टी**—सह्यपर्वताचे जंगलांत रानटी जनावरांना दडून राहण्याची चांगली सोय आहे. म्हणून या पट्टींत हीं जनावरें फार आहेत. वाघ, चित्ता, रानडुकर, अस्वल, कोल्हा, खोकड हीं या पट्टींतील जनावरें आहेत.

**मध्यपट्टी**—ही पट्टी मनुष्यवस्तीनें गजबलेली आहे. म्हणून यांत या जनावरांचा भरणा फार कमी आहे. कोल्हा, खोकड, ससा, हरिण हीं गरीब जनावरें असून क्वचित् ठिकाणीं वाघ आहेत.

**पूर्वपट्टी**—डोंगर व झाडी कमी असल्यामुळें मोकळ्या मैदानांत राहाणारीं जनावरें हरिणें हीं या पट्टींत फार आहेत. याशिवाय लांडगा, कोल्हा, खोकड, ससा व सीताबाईचे डोंगरांत वाघ आहेत.

**पाळीव जनावरें**— शेतीच्या उपयोगाचीं जनावरें— बैल सर्वत्र आहेत. रेडे वाळवें तालुका व शिराळें पेटा यांत थोड्याफार ठिकाणीं आहेत. दूधदुभत्यासाठीं गाई, म्हशी व शेळ्या सर्वत्र पाळल्या जातात. पूर्वपट्टींत विशेषतः माण पेट्यांत गाईबैलांची पैदास फार चांगली होते. खिलारी बैल तिकडचेच प्रसिद्ध आहेत. पण जोपासना चांगली होण्यास लोक गरीब असल्यामुळें अडथळा येतो. म्हणून त्या भागांत दांडगीं, धिप्पाड जनावरें आढळत नाहींत. मध्यपट्टींत विशेषतः दक्षिणभागीं जोपासनेमुळें जनावरें फार धिप्पाड आहेत. मेंढरांना चराऊ जमीन फार लागते म्हणून तीं पूर्वपट्टींत फार आहेत. उन्हाळ्याचे दिवसांत तिकडील धनगर लोक मेंढरें घेऊन मध्य व पश्चिमपट्टींत जातात. याशिवाय घोडे, गाढवें, कुत्रे, डुकरें हीं जनावरें थोडींफार सर्व जिल्ह्यांत आहेत. पूर्वपट्टींत कुत्र्यांची पैदास चांगली होते. ते शिकारी कुत्रे म्हणून प्रसिद्ध आहेत.

**जलचरप्राणी**—कृष्णा, कोयना, वेण्णा इ० नद्यांत मासे पुष्कळ प्रकारचे आहेत. कांहीं ठिकाणीं सुसरी आहेत.

**पक्षी**—मोर, पोपट, भारद्वाज इत्यादि सुंदर पिसाऱ्याचे पक्षी; घार, कावळा, गिधाड इत्यादि घाण नाहींसे करणारे पक्षी व चिमणी, साळुंक्या, पारवे इत्यादि इतर पक्षी जिल्ह्यांत बहुतेक सर्व ठिकाणीं आढळतात.

**वनस्पति**—वनस्पति ह्या मनुष्यांच्या फार उपयोगीं पडतात. कांहींपासून खाण्यास अन्न मिळतें, कांहीं इमरतीस उपयोगीं पडतात, कांहीं औषधासाठीं व इतर किरकोळ कामासाठीं उपयोगीं पडतात. खाण्यास उपयोगीं पडणाऱ्या वनस्पति पिकांच्या पाठांत दिल्या आहेतच. बाकीच्या वनस्पतींचे तीन प्रकार पडतात ( १ ) **इमारतीच्या उपयोगी, ( २ ) फळझाडें व ( ३ ) इतर झाडें.**

( १ ) **इमारतीच्या उपयोगी झाडें—पश्चिमपट्टी**—सागवान, शिसव, जांभूळ, कळक, ऐन हीं झाडें आहेत. या झाडांना जास्त पांऊस मानवतो, म्हणून हीं येथें येतात. बाभूळ व लिंब यांना जास्त पाऊस मानवत नाहीं म्हणून तीं या भागांत फारशीं नाहींत.

( १ ) **मध्यपट्टी**—बाभूळ, जांभूळ, लिंब, कळक. या पट्टींत बाभूळ जास्त आहेत.

**पूर्वपट्टी**—बाभूळ, लिंब, जांभूळ, खैर. या पट्टींत लिंब फार आहेत.

( २ ) **फळझाडें**—आंबे कमजास्त प्रमाणानें सर्वत्र आहेत. विशेषत: जिल्ह्याच्या उत्तरार्धांत यांचें उत्पन्न जास्त आहे. फणस पश्चिमभागांत आहेत; पूर्वभागांत यांचें एकही झाड नाहीं. पेरू, लिंबें, रामफळ, सीताफळ, संत्रीं, केळीं इत्यादि फळझाडें या जिल्ह्यांत असून माण तालुक्यांत डाळिंबाच्या पुष्कळ बागा आहेत. येथील डाळिंबें चवदार व मोठीं असतात.

( ३ ) **इतर झाडें**—चिंच, कवठ, करंज व निरनिराळ्या प्रकारचीं डोंगरी झाडें पुष्कळ आहेत. जिल्ह्याच्या पश्चिमेकडे झाडी फार असून पूर्वेकडे क्रमानें कमी कमी होत गेली आहे.

**खनिज पदार्थ**—सह्याद्रींत लोखंडाची माती सांपडते; पण हल्लीं तिजपासून कोणी लोखंड काढीत नाहीं. पूर्वीं धावडी लोक या मातीपासून लोखंड तयार करीत असत. इमारतीच्या उपयोगी असे

काळे दगड जिल्ह्यांत सर्वत्र आहेत. चुनखडी सपाट मैदानावर सांपडते, तिजपासून चुना तयार करतात. चुनखडीचे खडे पूर्वपट्टींत जास्त आहेत. माणपेटा व खानापूर तालुका यांत मातीचीं भांडीं उत्तम होतील अशी उत्तम माती बऱ्याच ठिकाणीं आहे. पूर्वपट्टींत पूर्वी एक प्रकारच्या मातीपासून मीठ तयार करीत असत, पण मिठावर कर बसल्यापासून मीठ तयार करण्यास बंदी झाली आहे.


---

## पाठ १० वा.

### दळणवळणाचीं साधनें.

आपणांला पुष्कळ वेळां सरकारी किंवा खाजगी कामासाठीं दुसऱ्या गांवीं जावें लागतें. सरकारी अधिकाऱ्यांना जिल्ह्यांत फिरावें लागतें. लांबच्या ठिकाणीं राहणाऱ्या मनुष्यास पत्रानें किंवा तारेनें बातमी कळवावी लागते. अशा प्रकारें दुसरीकडे जाणेंयेणें आणि पत्रें वगैरे पाठविणें याला दळणवळण म्हणतात. दळणवळणाच्या सोई निरनिराळ्या प्रकारच्या असतात. ( १ ) **रेलवे**, ( २ ) **पक्क्या सडका**, ( ३ ) **कच्च्या सडका**, ( ४ ) **पायरस्ते**, ( ५ ) **पोस्ट ऑफिसें** व ( ६ ) **तार ऑफिसें** हीं दळणवळणाचीं साधनें आहेत. आपल्या जिल्ह्यांत वरील सोयी कोणत्या प्रमाणांत आहेत तें पाहूं.

( १ ) **रेलवे**—जिल्ह्याच्या मधोमध दक्षिणोत्तर आगगाडीचा रस्ता गेला आहे. ह्या रस्त्यावर लोखंडी रूळ असून दोन रुळांमधील रुंदी ३॥ फूट आहे. या रुळांवरून आगगाडी चालते. हा रस्ता पुण्याहून मद्रासपर्यंत गेला आहे. याला मद्रास सदर्न मराठा रेलवे असें नांव आहे. आपल्या जिल्ह्यांत या रस्त्यावर पुढील स्टेशनें आहेत—लोणंद, सालपें, आदर्की, वाठार, पळशी, सातारा रोड,




कोरेगांव, रहिमतपूर, तारगांव, मसूर, शिरवडें, कराड, शेणोली, भिचूद, ताकारी, किर्लोस्करवाडी, भिलवडी व नांद्रें. कोरेगांव हें स्टेशन पुणें व मिरज जंक्शन यांच्या मध्यावर असलेमुळें तेथें नेहमीं इंजिनें, डबे व दगडी कोळसा शिल्लक असतो. आगगाडीनें प्रवास व मालाची ने–आण लवकर व थोड्या खर्चांत करतां येते.

( २ ) **पक्क्या सडका**—खडी टाकून पक्के केलेले रस्ते पुष्कळ आहेत. या जिल्ह्यांतील पक्क्या सडकांचें केंद्र सातारा हें ठिकाण आहे. या ठिकाणाहून बहुतेक सर्व रस्ते जिल्ह्यांत पसरले आहेत. इतर ठिकाणाहून कांहीं रस्ते गेले आहेत पण ते थोडे आहेत.

( १ ) साताऱ्याहून जाणारे रस्ते, ( २ ) पंढरपूर, चिपळूण, पुणें, बेळगांव या ठिकाणीं जाणारे रस्ते व ( ३ ) किरकोळ रस्ते असे रस्त्यांचे तीन गट पडतात.

( १ ) पुणें–कोल्हापूर नवा रस्ता—हा रस्ता कोल्हापुराहून निघून साताऱ्यावरून पुण्यास गेला आहे. हा रस्ता हिंदुस्थानांतील मोठ्या रस्त्यांपैकीं एक आहे. याला ' इम्पिरियल रोड ' असें म्हणतात. याशिवाय दुसरे रस्ते आहेत. त्यांचीं नांवें–सातारा–पुणें जुना रस्ता. सातारा–पंढरपूर रस्ता. सातारा–तासगांव रस्ता. सातारा–परळी रस्ता व सातारा–महाबळेश्वर रस्ता.

( २ ) वर्धोघाट–पंढरपूर रस्ता ( मल्हारपेठ–पंढरपूर रस्ता ), कऱ्हाड–विजापूर रस्ता, कऱ्हाड–चिपळूण रस्ता, पुणें–बेळगांव जुना रस्ता.

( ३ ) वाईमहाबळेश्वर रस्ता, फलटण शिंगणापूर रस्ता, पुसेसावळी–शिंगणापूर रस्ता, पुसेगांव–कातरखटाव रस्ता, पेठ–मिरज रस्ता, पेठ–शिराळे रस्ता, इसलामपूर–ताकारी रस्ता.

ह्या सर्व पक्क्या सडका आहेत. यांवरून बैलगाड्या, तांगे, मोटारी हीं वाहनें चालतात. याशिवाय साधे लोकलबोर्डाचे ताब्यांतील गाडीरस्तेही बरेच आहेत. त्यांचा उपयोग बैलगाड्यांना होतो. मोटारींना उपयोग होईल इतकी चांगली स्थिति या रस्त्यांची नाहीं. पायवाटा लोकांच्या सोईप्रमाणें सर्वत्र भरपूर आहेत.

मोठ्या गांवांतून पोस्टाची सोय आहे. पोस्टांतून आपण कार्डें, पाकिटें पाठवितों; तसेंच पैसे व लहान लहान जिन्नसही पाठवितां येतात.

बातमी फार लवकर पाठवावयाची असेल तर ती तारेनें पाठविण्यांत येते. तारेची सोय जिल्ह्यांत थोड्याच ठिकाणीं आहे. रेलवेच्या कडेला स्टेशनच्या गांवीं व जिल्ह्यांतील बहुतेक तालु-

ज्यांच्या गांवीं तारेची सोय आहे. रकम लवकर पोंचावयाची असेल तर तारेनें मनीआर्डर करतात. सर्व ब्रँच पोस्टांना तारेचा मजकूर घेऊन सब् ऑफिसला पाठविण्याचा अधिकार आहे.

या सर्व साधनांमुळें प्रवास आणि मालाची ने-आण या गोष्टी सोईच्या व थोड्या खर्चाच्या झाल्या आहेत.

---

## पाठ ११ वा.

### उद्योगधंदे व कारखाने. ( भाग १ ला )

आपल्या जिल्ह्यांत मुख्य धंदा शेतीचा आहे, ७।८ लाखांपेक्षां जास्त लोक हा धंदा करतात. म्हणजे जवळ जवळ शेंकडा ७५।८० वर लोक ह्या कामांत गुंतले आहेत. शेतीचा धंदा करणाऱ्यांमध्यें मराठ्यांचा भरणा जास्त आहे. शिवाय जैन, माळी, मुसलमान हेही लोक शेतकी करतात. शेतीचा धंदा करणाऱ्या बहुतेकांना स्वतःची जमीन आहे; पण ज्यांना आपला उदरनिर्वाह होण्यास जमीन कमी पडते ते व ज्यांना जमीन नाहीं ते, दुसऱ्याच्या जमिनी वांटथानें किंवा खंडानें करतात. कांहीं ठिकाणीं पिकांना पाऊस पुरेसा पडत नाहीं, त्या ठिकाणीं पाट काढले आहेत व विहिरी खणल्या आहेत. पाट व विहिरी अपुऱ्याच आहेत. पाऊस पडला नाहीं म्हणजे पाटाच्या कडेला व विहिरीवर तेवढें पीक येतें व बाकीच्या भागांत दुष्काळ पडतो. अशी स्थिति पूर्वपट्टींत आहे. म्हणून तेथील लोक पोटासाठीं मुंबई, पुणें, वऱ्हाड, कराची इकडे उद्योगधंदा करण्यासाठीं जातात. शहरांत लोकांना मिळकत जास्त होते म्हणून वरील शहरीं पुष्कळ लोक जातात. शेतीच्या धंद्यांत उत्पन्न कमी येत असल्यामुळें त्यांचें शेतीवरील प्रेम कमी झालें आहे. त्यामुळें शेती खालावत चालली आहे. मध्यपट्टींतील शेती

पिकाऊ असल्यामुळें व पाऊस पुरेसा पडत असल्यामुळें तेथील लोक इतर ठिकाणीं फारसे जात नाहींत, म्हणून त्यांची शेती बरीच चांगली आहे.

शेतीच्या खालोखाल दुसरा धंदा विणकामाचा आहे. साळी, कोष्टी लोक हा धंदा करतात. लुगडीं, पासोड्या व धोतरें, हें कापड मागावर तयार होतें. पूर्वपट्टींत मेंढरें पाळणें हा धनगरांचा धंदा आहे व या मेंढरांपासून जी लोंकर निघते तिजपासून घोंगड्या तयार करण्याचा धंदा सनगर लोकांचा आहे.

आपल्या जिल्ह्यांत भुइमुगाच्या शेंगांचें उत्पन्न फार मोठें आहे. भुइमुगाच्या शेंगा फोडण्याच्या गिरण्या बऱ्याच ठिकाणीं आहेत. ताकारी, इसलामपूर, कऱ्हाड, मसूर, रहिमतपूर, कोरेगांव इत्यादि ठिकाणीं या गिरण्या आहेत. पिठाच्या गिरण्या बहुतेक सर्व मोठ्या गांवीं आहेत.

जिल्ह्यांत उत्पन्न होणारा माल बाहेर पाठविणें व जिल्ह्यांतील लोकांना जरूर लागणारा माल आणणें याला व्यापार म्हणतात. वाणी, गुजर, मारवाडी हे लोक बहुतेक व्यापारी आहेत.

जनावरें परठिकाणीं पाठविणें व मेलेल्या जनावरांचीं कातडीं विकत घेऊन तीं कच्चीं व कमवून दुसरीकडे पाठविणें हा धंदा महार, मांग, मुसलमान, चांभार व ढोर हे लोक करतात.

या शिवाय सुतार, गवंडी, लोहार, कुंभार इत्यादि धंदेवाले लोक खेड्यापाड्यांतून आहेत. शेतीचीं औतें करणें, कापड विणण्याचे माग तयार करणें, घरें बांधणें, गाड्या तयार करणें; विटा, कौलें, मातीचीं भांडीं करणें; दोऱ्या वळणें इत्यादि धंदे गांवोगांव चालतात. चुनखडीचे दगड ज्या ठिकाणीं आहेत त्या ठिकाणीं चुना तयार करण्याच्या भट्ट्या आहेत.

पक्क्या सडका बऱ्याच असल्यामुळें रहदारीसाठीं मोटारींचा

उपयोग केला जातो. मोटार सर्व्हिस ठेवून प्रवाशांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पोंचविण्याचा धंदा कांहीं लोकांनीं सुरू केला आहे.

सरकारी कामकाजांत निरनिराळ्या खात्यांत नोकऱ्या करणें हा एक धंदा आहे. यांत ब्राह्मणवर्ग फार आहे. हल्लीं इतर जातींचे लोक सरकारी नोकऱ्यांत जोरानें प्रवेश करून घेत आहेत.

---


# पाठ १२ वा.

## उद्योगधंदे व कारखाने. ( भाग २ रा. )

मागील पाठांत सांगितलेले धंदे हे आपल्या देशांत वडिलोपार्जित चालत आलेले धंदे आहेत. एकादा मोठा धंदा पुष्कळ लोक कामावर ठेवून एकाद्या गृहस्थानें आपले इकडे फारसा केलेला नाहीं. आपले सर्व धंदे आपण व आपल्या कुटुंबांतील मंडळी यांच्या साहाय्यावरच चाललेले असतात. पण युरोप, अमेरिका वगैरे सुधारलेल्या देशांत पुष्कळ मोठे धंदे आहेत. कांहीं कांहीं धंद्यांत हजारों माणसें राबत असतात. पुष्कळ लोक एके ठिकाणीं काम करून जो मोठा धंदा करतात, त्यालाच कारखाना म्हणतात. हे कारखाने वाफेच्या व विजेच्या शक्तीनें चालतात. अशा तऱ्हेचे कारखाने आपल्या देशांतही निघाले आहेत. आपल्या जिल्ह्यांत या पद्धतीचे तीन मोठे कारखाने आहेत.

( १ ) किर्लोस्करवाडी—श्री० लक्ष्मणराव किर्लोस्कर या सद्गृहस्थांनीं प्रथम कुंडल स्टेशनजवळ माळावर लोखंडाचे नांगर तयार करण्याचा कारखाना सुरू केला. त्या ठिकाणीं कामासाठीं

परठिकाणचे लोक येऊन राहूं लागले व त्याला गांवाचें स्वरूप आलें. या गांवास त्यांनीं ' किर्लोस्करवाडी ' हें नांव दिलें आहे. हल्लीं हा कारखाना फार वाढला आहे. यांतील सर्व यंत्रें विजेच्या शक्तीनें चालतात. या कारखान्यांत लोखंडी नांगर फार तयार




किर्लोस्करकारखाना.

होतात व त्यांचा खप हिंदुस्थानच्या सर्व भागांत होतो. शिवाय ब्रह्मदेश, जपान वगैरे परदेशांतही हे नांगर जातात. नांगराशिवाय शेतीला उपयोगी असे ऊस गाळण्याचे चरक, मोटेचीं चाकें वगैरे तयार होतात. इमारतीला शोभा आणण्यासाठीं लोखंडी कठडे निरनिराळ्या वेलबुट्टीचे तयार होतात. खुर्च्या, बाकें, स्प्रिंगचे पलंग-विहिरींतून पाणी काढण्यासाठीं पंप, शेंगा फोडण्याचीं यंत्रें, कडबा कापण्याचीं यंत्रें इत्यादि लोखंडाचे जिन्नस तयार होतात. कारखान्यांची माहिती देण्यासाठीं व उद्योगधंद्याबद्दल आवड उत्पन्न करण्यासाठीं या कारखान्यातर्फे ' किर्लोस्कर खबर ' या नांवाचें मासिक निघतें.

**सातारारोड**—या ठिकाणीं खानबहादूर कूपर यांनीं किर्लोस्करवाडीऱ्या पद्धतीवर लोखंडी सामान तयार करण्याचा कारखाना काढला आहे. या कारखान्यास ' दी कूपर इंजिनियरिंग वर्क्स ' हें नांव आहे. या ठिकाणीं होणारे लोखंडी नांगर आपल्या देशांत चोहोंकडे रवाना होऊन परदेशींही जातात. कठडे, चरक वगैरे लोखंडी सामान तयार होतें.

**ओगलेवाडी**—श्री. गुरुनाथराव ओगले या गृहस्थांनीं कऱ्हाड स्टेशनच्या जवळ कांचसामानाचा कारखाना काढला आहे. या कारखान्यांत कंदील, स्टँड यांचे ग्लास; बरण्या, बशा, मंगलुरी कौलासारखीं कौलें, पेपरवेट, हरतऱ्हेचे शोभेचे पदार्थ पुष्कळ मोठ्या प्रमाणावर तयार केले जातात. हें कांचसामान विलायती मालापेक्षां स्वस्त पडत असल्यामुळें याचा खप फार आहे. कांचसामानाच्या जोडीला यांनीं कंदिलाचा कारखाना काढला आहे. या कंदिलांना ' प्रभाकर कंदील ' असें नांव आहे. प्रथम पितळी कंदील तयार होत होते हल्लीं टीनचेही कंदील तयार होतात.

**कऱ्हाड**—कापसाचें कापड विणण्याची एक गिरणी आहे.



" ओगले ग्लास वर्क्सचा दुरून दिसणारा देखावा. "

आगपेट्या तयार करण्याचा कारखाना नुकताच बंद झाला आहे. टिळकमहाविद्यालयांत धंदेशिक्षण घेऊन आलेल्या कांहीं गृहस्थांनीं येथें उद्योगधंदा सुरू केला आहे. त्यांनीं नुकतीच उत्तम प्रतीची नाव बांधून दिली.

सुपनें येथें पायमोजे व गंजिफ्रॉक्स तयार होतात.
किन्हई येथें औषधी द्रव्यें, देवीची लस तयार केली जाते.

---


## पाठ १३ वा.

### व्यापार.

आपल्या जिल्ह्यांत जो माल तयार होतो व लोकांच्या गरजा भागून शिलक उरतो तो बाहेर जातो; व ज्याची जिल्ह्यांतील लोकांना जरूर असते पण आपल्या जिल्ह्यांत तो माल कमी तयार होतो किंवा मुळींच तयार होत नाहीं तो माल परठिकाणाहून आपल्या जिल्ह्यांत येतो. जिल्ह्यांतून बाहेर जाणाऱ्या मालास निर्यात माल व बाहेरून येणाऱ्या मालास आयात माल म्हणतात.

**निर्यात माल**— जमिनींत उत्पन्न होणाऱ्या मालापैकीं भुइमुगाच्या शेंगा व शेंगदाणे फार रवाना होतात. मुंबई इलाख्यांत जितका भुइमूग होतो त्यांतील निम्म्यापेक्षां जास्त भुइमूग एकट्या सातारा जिल्ह्यांत होतो. शेंगा व शेंगदाणे मुंबईस रवाना होतात व तेथून विलायतेस जातात. कऱ्हाड व वाळवे तालुक्यांत गूळ फार तयार होतो, तो बहुतेक सर्व सांगलीस जातो. बराच मुंबईसही रवाना होतो. या व तासगांव तालुक्यांत उत्पन्न होणारीं पिकें—हळद व कापूस हीं सांगलीस जातात; नागवेलीचीं पानें मुंबईला व थोडीशीं पुण्याला जातात. तंबाखू सांगली व कोंकण इकडे जाते. पेठेचा तंबाखूचा व्यापार कोंकणाशीं फार आहे. बटाटे वाई, कोरेगांव या तालुक्यांत होतात व ते पुणें, मुंबई येथें जातात. लोणंदहून कांदे फार रवाना होतात. घायाळाचा माल पूर्वभागीं सोलापूर जिल्ह्याच्या माळशिरस व पंढरपूर तालुक्यांत जातो.

वाख खटाव व माणपेटा यांत जास्त होतो. याशिवाय आंबे, चिंच, जनावरें वगैरे परठिकाणी जातात. कारखान्यांतून तयार




झालेला माल–लोखंडी नांगर व इतर जिन्नस, कांचसामान, कंदील हा कारागिरीचा माल बाहेर जातो. घोंगड्या कोंकणांत जातात. भुइमुगाच्या शेंगा व दाणे, ताकारी, कऱ्हाड, मसूर, रहिमतपूर या स्टेशनवरून फार रवाना होतात. गूळ शेणोली व कऱ्हाड स्टेशनवरून, नागवेलीचीं पानें ताकारी व तारगांव या स्टेशनवरून परठिकाणीं पुष्कळ जातात. तंबाखू पेठेहून फार जाते. निर्यात मालाचीं हीं मुख्य ठिकाणें आहेत.

तांदूळ, ज्वारी, बाजरी इत्यादि धान्यें या जिल्ह्यांतील लोकांना पुरेशीं होतील इतकीं पिकत नसल्यामुळें तीं परठिकाणीं न जातां परठिकाणाहून येतात.

**आयात माल**—आयातीची मुख्य पेठ कराड व कोरेगांव आहे. या खालोखाल, इस्लामपूर, सातारा, वाई या पेठा आहेत. तांदूळ फक्त पश्चिम भागांत होतो; पण तेवढा पुरेसा होत नाहीं, म्हणून महाडकडील तांदूळ वाईस येतो. शिवाय कोंकण, रंगून, बेझवाडा इकडील तांदूळही वरील आयातीच्या पेठांत येतो, तेथून जिल्ह्यांत गांवोगांव जातो.

ज्वारी, बाजरी हीं धान्यें नाशिक, सोलापूर या जिल्ह्यांतून व निजामचे राज्यांतून येतात. मीठ, नारळ, सुपारी व मसाल्याचे जिन्नस हीं मुंबईहून येतात. पांढरें कापड मुंबई, सोलापूर या ठिकाणच्या गिरण्यांतून व लुगडीं आणि चोळखण हीं रपकई, बनहट्टी, इरकल, शहापूर वगैरे कानडी मुलखांतून जास्त येतात. सोलापूर व महेश्वर येथूनही लुगडीं येतात. तेथील विणकरी लोकांना विणण्यास लागणारें सूत मुंबईहून येतें. याशिवाय राकेल, साखर, आगपेट्या, स्टेशनरी सामान, कागद, चैनीचे पदार्थ, यंत्रें. किर्लोस्करवाडी, सातारारोड व ओगलेवाडी या ठिकाणीं तयार होणाऱ्या मालासाठीं लागणारा कच्चा माल बाहेरून येतो. आपल्या येथें येणारा बहुतेक माल मुंबईहून येतो. बाहेरून येणारा माल मुख्यत्वेंकरून आगगाडीनें स्टेशनांवर येतो व तेथून बैलगाडीनें जिल्ह्यांत चोहोंकडे पोंहोचता होतो.

# पाठ १४ वा.

## लोक.

सातारा जिल्ह्यांत ११ शहरें व १३३१ गांवें असून दोहोंमध्यें मिळून २४२५०१ घरें आहेत. या घरांत राहाणाऱ्या एकंदर लोकांची संख्या सन १९२१ च्या खानेसुमारीप्रमाणें १०२६२५९ आहे. पैकीं पुरुष ५११४८० स्त्रिया ५१४७७९ आहेत.

या जिल्ह्यांत निरनिराळ्या धर्मांचे लोक राहतात. त्यांची धर्मवार लोकसंख्या पुढीलप्रमाणें आहे. हिंदू ९७१८६२, जैन १५३०१, बुद्ध १, मुसलमान ३५९८९, ख्रिश्चन २५५२, झोरोआस्ट्रियन ४९८, इतर ५६.

सन १८९१ सालीं या जिल्ह्याची लोकसंख्या १२२४८७८ होती. प्लेगची सांथ, इतर रोग, दुष्काळ यांमुळें ती आतांपर्यंत कमी होत आली आहे. सुमारें २ लक्ष लोकसंख्या कमी झाली आहे. या जिल्ह्याच्या पूर्वपट्टींतील लोक पोट भरण्यासाठीं मुंबई, कराची वगैरे ठिकाणीं जातात.

जिल्ह्यांत सर्वांत जास्त वस्ती हिंदू लोकांची आहे. मराठा, ब्राह्मण, वाणी, सोनार, साळी, माळी, कोष्टी, महार, मांग, शिंपी वगैरे पुष्कळ जाती आहेत. सर्वांत मराठ्यांची संख्या जास्त आहे. ७ लाखापेक्षां जास्त मराठे वस्ती आहे. मराठ्यांचा मुख्य धंदा शेतकीचा आहे. कांहीं मोलमजुरी करतात; कांहीं मुंबई, कराची या शहरांकडे मोलमजुरीसाठीं धांव घेतात. मराठ्यांची सांपत्तिक स्थिति बेताची आहे. शिक्षणाचा प्रसार फार कमी आहे. शरीरप्रकृतीनें सुदृढ व काटक असे हे लोक असून यांना पोकळ मोठेपणा दाखविण्याची सवय आहे. इतर लोकांकडून फार प्रयास

न करतां हे फसले जातात १०।१२ वर्षांपूर्वी युरोपांत जें महा-युद्ध झालें, त्यावेळीं या जिल्ह्यांतील पुष्कळ मराठे गेले होते. लढाईंत यांनीं चांगला नांवलौकीक मिळविला आहे.

**ब्राह्मण लोकांची** संख्या ३६००० आहे. हे लोक थोडे असूनही बुद्धिमान् व स्वहिततत्पर असल्यामुळें मोठमोठ्या नोकऱ्यां-वर आहेत. सांपत्तिक स्थिति बरी आहे. शरीरानें हे लोक ढिले आहेत. काटकपणा व काबाडकष्ट करण्याची संवय फार कमी आहे. जिल्ह्यांतील सर्व लोकांपेक्षां हे लोक सुखी आहेत. साळी, कोष्टी लोकांची वस्ती खटाव, खानापूर, तासगांव, वाळवें या तालुक्यांत बरीच आहे. यांचा धंदा लुगडीं व पांढरें कापड विणणें हा आहे. या लोकांना शेतीचें उत्पन्न फारसें नाहीं. यांना विण-कामावर प्रपंच चालवावा लागतो.

यांना आपल्या धंद्यांत बराच पैसा मिळतो पण खर्च फार करतात म्हणून यांची सांपत्तिक स्थिति चांगली नाहीं. शिंपी, वाणी हे व्यापारी लोक आहेत यांची स्थिति बरी आहे. मारवाडी, गुजर हे लोक मारवाड व गुजराथ इकडील राहणारे आहेत. हे व्यापारासाठीं इकडे येऊन कायम वस्ती करून राहिले आहेत. हे लोक व्यापारांत हुशार असून पैशाचे फार लोभी आहेत. यांच्यांत गरीब मनुष्य क्वचित् आढळतो. सावकारी करून शेत-कऱ्यांची शेती यांनीं बऱ्याच ठिकाणीं बळकावली आहे. हे घरांत मारवाडी गुजराथी भाषा बोलतात व बहुतकरून आपल्या भाषेंतच व्यवहाराचा सर्व हिशेब ठेवतात.

धंदेवाल्या लोकांची स्थिति मध्यम आहे. महार, मांग हे लोक फार अडाणी असल्यामुळें त्यांना मोलमजुरी केल्याशिवाय पोटाला मिळणें कठीण पडते. हे लोक फार काटक आहेत. महार लोक सरकारी कामें करतात; मांग दोर वळण्याचा धंदा करतात.

मुसलमान लोक शेतीचा, विणकामाचा धंदा करतात. व्यापार उदीम करणारेही बरेच मुसलमान आहेत. शरीरप्रकृतीनें हे लोक चांगले आहेत. सांपत्तिक स्थिति साधारण आहे. यांच्यांत धर्माविषयीं फार अभिमान दिसून येतो.

ख्रिश्चन लोक बऱ्याच ठिकाणीं आहेत. राज्यकर्ते ख्रिश्चनधर्मी असल्यामुळें त्यांचा धर्म येथील पुष्कळ हिंदू लोकांनीं स्वीकारला आहे. यांची वस्ती वाई, सातारा, वाळवें या तालुक्यांत आहे. यांना शिक्षण देण्यासाठीं अमेरिकन मिशनतर्फे वेगळ्या शाळा आहेत.

जैन लोक दक्षिणभागीं आहेत. वाळवें व तासगांव या तालुक्यांत यांची वस्ती आहे. यांचा धंदा शेतीचा आहे. जैन मंडळी संसार फार चिकाटीनें करतात. कांहीं जैन व्यापारी आहेत.

---

# पाठ १५ वा.

## लोकस्थिति.

हवामान, पीकपाणी, खाणेंपिणें इत्यादि गोष्टींचा मनुष्यांवर परिणाम घडत असतो; त्यामुळें निरनिराळ्या ठिकाणच्या माणसांचें शरीर व स्वभाव यांत फरक दिसून येतो. शरीराला कमी उष्ण हवा, सकस खाणें जास्त मानवतें; व उष्ण व दमट हवा, कमी सकस खाणें कमी मानवतें. शरीराच्या घाटणीवर स्वभाव बराच अवलंबून असतो. आपल्या जिल्ह्याचा कोणता भाग कसकशा प्रकारचा आहे व त्याचा माणसावर काय परिणाम झाला आहे तें पाहूं.

**पश्चिमपट्टी**--ही पट्टी डोंगराळ असून झाडी फार आहे. पावसाळ्यांत पाऊस फार पडतो. जास्त पावसामुळें झाडांचीं पानें कुजतात व जमीन ओलसर राहते. म्हणून पावसाळ्यांतील म्हणजे ज्येष्ठा-

पासून आश्विनपर्यंत या पट्टींतलि हवा रोगट असते. मलेरिया व तापाच्या साथी सुरू होतात. पुढें कार्तिकापासून वैशाखापर्यंत पाऊस पडत नाहीं. डोंगरामुळें हवा कमी उष्ण असते. झाडाझुडपांमुळें सृष्टिसौंदर्य फार खुलून दिसतें. या दिवसांत हवा चांगली असते. उन्हाळ्याचे दिवसांत पुष्कळ लोक या पट्टींत हवा खाण्यास जातात.




या पट्टींत तांदूळ हें लोकांचें मुख्य अन्न आहे. तें कमी कसदार आहे, म्हणून येथील लोकांची शरीरप्रकृति फार धिप्पाड नाहीं. उत्पन्न बेताचें येत असल्यामुळें पोटाला मिळविण्यासाठीं

येथील लोकांना फार उद्योग करावा लागतो. त्यामुळें ते काटक व कष्टाळू आहेत. संपत्तीमुळें येणारे रगेलपणा, घमेंडखोरपणा, बेपर्वाई, चैन हे दुर्गुण यांचे ठिकाणीं फारसे आढळून येत नाहींत. गरीब, पापभीरू, भोळे असे हे लोक असून चैनीकडे यांची प्रवृत्तिच नाहीं. साधेपणा बराच दिसून येतो.

**मध्यपट्टी**—हवामान बारा महिने चांगलें असतें. पावसाळ्यापेक्षां इतर वेळीं जास्त चांगलें असतें. केव्हां केव्हां तापाच्या साथी सुरू होतात. झाडी बरीच व प्रदेश पिकाऊ असून गहूं, ज्वारी हें सकस अन्न लोकांच्या खाण्यांत येतें. म्हणून लोक आनंदी व सुदृढ शरीरप्रकृतीचे आहेत. लोकांना पोटापाण्यासाठीं फार कष्ट करावे लागत नसल्यामुळें ते काटक व कष्टाळू कमी आहेत. सांपत्तिक स्थिति समाधानकारक असून पोटाला मिळविण्यासाठीं वर्षांतील फार तर निम्मे दिवस राबावें लागतें. बाकीच्या मोकळ्या वेळांत जवळचा पैसा यांना स्वस्थ बसूं देत नाहीं. मारामारी करणें, दावे करणें, चैनीनें वागणें या गोष्टी यांच्या आंगवळणीं पडल्या आहेत. विशेषत: वाळवें व कऱ्हाड या तालुक्यांत हा प्रकार आहे. या भागांतील लोक चळवळ करणारे आहेत. चळवळ करणें किंवा दुसरीं सार्वजनिक कामें करणें यांची या पट्टींतील लोकांना जणूं आवडच आहे.

या वरील माहितींत कोरेगांव तालुक्याच्या अर्धापासूनचा खालील भाग येतो. वरील भाग काहींसा पश्चिम पट्टीला धरून व पूर्वपट्टीला धरून आहे.

**पूर्वपट्टी**—झाडी कमी, डोंगर कमी म्हणून हवा उष्ण आहे. पाऊस कमी असल्यामुळें हवेंत दमटपणा कमी असतो. येथील हवा आरोग्याला उत्तम आहे. फक्त उन्हाळ्यांत उन्हाचा थोडासा त्रास सहन करावा लागतो. ज्वारी, बाजरी, गहू हें लोकांचें अन्न आहे. प्रदेश कमी सुपीक असल्यामुळें वर्षांतील बहुतेक दिवस व कांहीं

ठिकाणीं बारा महिने कामधंदा करावा लागतो. सांपत्तिक स्थिति चांगली नसल्यामुळें लोकांना स्वाथ्य नाहीं. त्यामुळें शरीरप्रकृति मध्यपट्ट्यांतील लोकांइतकी धिप्पाड नाहीं; पण पश्चिमपट्टींतील लोकांपेक्षां पुष्कळ चांगली आहे. लोक काटक व कष्टाळू आहेत. संपत्तीमुळें येणारे दुर्गुण यांच्यांत फारसे आढळत नाहींत, पण एकलकोंडेपणा बेपर्वाई हीं आंगीं आहेतच. सातारा जिल्ह्यांतील लढाऊ म्हणून प्रसिद्ध असलेले लोक या भागांतीलच विशेष आहेत. पोटापाण्याच्या उद्योगामुळें सार्वजनिक चळवळ फारशी होत नाहीं. लोक पुराणमतवादी आहेत.

प्लेग, कॉलरा, देवी येणें, तापाची साथ हे रोग जिल्ह्यांत वरचेवर होतात. रोगांवर औषधोपचार करण्यासाठीं ठिकठिकाणीं दवाखाने आहेत.

---

# पाठ १६ वा.

## भाषा व शिक्षण.

आपल्या जिल्ह्यांतील मुख्य भाषा 'मराठी' आहे. उर्दू, कानडी, गुजराथी, ह्या भाषा बोलणारे लोकही थोडेफार आहेत. मुसलमान लोक उर्दू भाषा बोलतात. जैन लोक कानडी भाषा बोलतात. ही भाषा जिल्ह्याच्या दक्षिणभागीं फक्त आढळून येते. या भागांत या भाषेंतील कांहीं शब्द मराठींत शिरले आहेत. गुजर, मारवाडी हे गुजराथी भाषा बोलतात. मराठी शिवाय इतर भाषा बोलणारांना मराठी भाषा येते. जिल्ह्यांतील बहुतेक सर्व व्यवहार मराठीमधून चालतो. कांहीं सुशिक्षित लोक इंग्रजी भाषा जाणतात. सरकारी कचेरी व दप्तर यांतून इंग्रजीचा विशेष प्रचार आहे.

इंग्रज सरकारचें राज्य सुरू झाल्यापासून सर्व लोकांना शिक्षण मिळावें म्हणून ठिकठिकाणीं शाळा काढल्या आहेत. जिल्ह्यांत मराठी शाळा जास्त आहेत. सातारा, वाई, कऱ्हाड, तासगांव याठिकाणीं इंग्रजी शिक्षणाच्या व मुसलमान वस्ती जास्त असेल अशा ठिकाणीं उर्दू शिक्षणाच्या शाळा आहेत. प्राथमिक शाळा सुमारें ११०० असून त्यांत सुमारें ६५००० विद्यार्थी शिकत आहेत. लोकांना शिक्षणाचें महत्व पटल्यामुळें खेडोपाडीं शाळा निघाल्या आहेत. प्राथमिक मोठ्या शाळांतून इंग्रजी तीन इयत्तेपर्यंतचे क्लास व शेतकी शिक्षणाचे क्लास जोडले आहेत. शेतकी क्लास जोडलेल्या शाळा ४ आहेत.

सुशिक्षितांचा भरणा ब्राह्मण लोकांमध्यें फार असून, वाणी, सोनार, शिंपी, गुजर यांत बरेच लोक शिकलेले आहेत. मुसलमान, जैन, मराठा, धंदेवाले लोक, अस्पृश्य यांच्यांत शिकलेल्यांचें प्रमाण क्रमानें कमी आहे.

---

## पाठ १७ वा.

### राजकीय व्यवस्था.

जिल्ह्याचे भाग, त्याचे अधिकारी व कामें (भाग १ ला).

राजव्यवस्थेच्या सोईसाठीं या जिल्ह्याचे १० तालुके केले आहेत. ते पहिल्या पाठांत दिलेच आहेत. माणपेटा हा स्वतंत्र तालुका होता पण एप्रिल १९२८ सालापासून पेटा केला आहे. जिल्ह्याचा मुख्य अधिकारी **कलेक्टर**, तालुक्याचा **मामलेदार** व पेट्याचा **महालकरी** असतो.

तालुक्याचे ठिकाणीं जे सरकारी अधिकारी असतात त्यांची माहिती तुम्हांस दुसऱ्या इयत्तेंत मिळाली आहेच. मामलेदार, फौजदार वगैरे अधिकाऱ्यांवर दुसरे अधिकारी असतात व ते जिल्ह्याचे मुख्य ठिकाणीं असतात. सारा वसूल करणें, गुन्हेगारांना पकडणें, लोकांना न्याय देणें वगैरे कामें सरकारनें वेगवेगळीं ठेविलीं आहेत. हीं कामें करण्याची सरकारनें व्यवस्था केलेली असते तीस खातें म्हणतात. निरनिराळीं खातीं व त्यांवरील जिल्ह्यांतील अधिकारी यांची आतां माहिती मिळवूं.

१ **मुलकी खातें**:—ह्याचा अर्थ वसुलाचें खातें असा आहे. ह्या खात्यावरील मुख्य अधिकाऱ्यास **कलेक्टर** म्हणतात. सारा वसूल करणें; चोरी, मारामारी, ह्यांसारख्या गुन्ह्यांची चौकशी करणें; जिल्ह्यांत आरोग्य व शांतता ठेवणें हीं कामें कलेक्टरास करावीं लागतात. या कामांत त्याला मदत करण्याकरतां आपल्या जिल्ह्यांत तीन अधिकारी आहेत. जिल्ह्याचें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं वाई डिव्हिजन व कऱ्हाड डिव्हिजन असे दोन भाग ( प्रांत ) करून प्रत्येकावर एक अधिकारी नेमला आहे, त्याला प्रांत म्हणतात. कलेक्टराच्या मदतीला दोन प्रांतांशिवाय जो तिसरा अधिकारी असतो त्याला **हुजूर डेप्युटी कलेक्टर** म्हणतात. याच्या ताब्यांत जिल्ह्याचा खजिना असतो. प्रांतसाहेब ' आय्. सी. एस्.' ची परीक्षा पास झालेले असतील तर त्यांना आसि० कलेक्टर म्हणतात.

२ **नोंदणी खातें**:—हेंहि कलेक्टराच्या ताब्यांतील खातें आहे. लोक एकमेकांना कर्जाऊ पैसे देतात, तसेंच जमिनीची खरेदी-विक्री होत असते. अशा व्यवहाराचे कागद सरकारी स्टँपवर लिहून त्या कागदाचा उतारा सरकारी बुकांत करून ठेवतात व मग त्यावर सरकारी शिक्का मारून तो मालकास परत देतात. असें

केल्यानें कोणालाही त्यांत बदल करतां येत नाहीं. ज्या अधिकाऱ्यासमोर हे कागद होतात त्यास **सब्‌रजिस्ट्रार** ह्मणतात. प्रत्येक तालुक्याचे ठिकाणीं व तालुका मोठा असल्यास दुसऱ्या मोठ्या गांवीं सब् रजिस्ट्रार असतात. त्यांच्यावर देखरेख करण्याकरितां **इन्स्पेक्टर ऑफ रजिस्ट्रेशन** नांवाचा अधिकारी कलेक्टराचे हाताखालीं असतो.

**३ न्याय खातें**:—ह्या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास **डिस्ट्रिक्ट जज्ज** म्हणतात. जमिनीच्या देवघेवीच्या मोठाल्या तंट्याचा निकाल डिस्ट्रिक्ट जज्ज करतो. तसेंच खून, दरोडे यांसारख्या फौजदारी गुन्ह्यांची ही याला चौकशी करावी लागते असे फौजदारी खटले कलेक्टराकडून डिस्ट्रिक्ट जज्जाकडे येतात. आरोपीला फांशीची व जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा देण्याचा अधिकार सेशन्स जज्जाला असतो. ह्याच्या हाताखालीं **सब्‌जज्ज** नांवाचे अधिकारी असतात. बहुतेक दोन तालुके मिळून एक सब् जज्ज असतो. ह्याच्याकडे जमिनीच्या व मिळकतीच्या लहान लहान तंट्यांचा निकाल करण्याचें काम असतें. सब् जज्जानें दिलेल्या निकालाच्या विरुद्ध डिस्ट्रिक्ट जज्जाकडे तक्रार करतां येते.

---

# पाठ १८ वा.

## जिल्ह्यांतील अधिकारी व त्यांचीं कामें. ( भाग दुसरा. )

**४ पोलीस खातें**:—या खात्याच्या जिल्ह्यांतील मुख्य अधिकाऱ्यास **पोलीस सुपरिंटेंडेंट** म्हणतात. जिल्ह्यांत बंदोबस्त ठेवणें व खून, चोरी, मारामारी वगैरे गुन्हे करणाऱ्या लोकांस पकडून

त्यांना कलेक्टराचे ताब्यांत देणें हीं त्याचीं कामें आहेत. याच्या मदतीस दोन अधिकारी असतात, त्यांपैकीं एकाला **असि० पोलीस सुपरिंटेंडेंट** व **दुसऱ्याला डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडेंट** म्हणतात. शिवाय **पोलीस इन्स्पेक्टर** नांवाचे दुसरे अधिकारी ह्यांच्या हाताखालीं असून प्रत्येकाच्या ताब्यांत दोन तीन तालुके असतात. इन्स्पेक्टरचे हाताखालचा **सब् इन्स्पेक्टर** हा अधिकारी आहे; यालाच **फौजदार** असेंही म्हणतात. प्रत्येक तालुक्यांत गुन्ह्याचें मान पाहून फौजदारांचीं ठाणीं एकापासून तीन चारपर्यंत असतात.

**५ शाळाखातें**:—हें खातें लोकलबोर्डाचे ताब्यांत आहे. या खात्यावरील लोकलबोर्डाच्या मुख्य अधिकाऱ्यास स्कूलबोर्ड चेअरमन म्हणतात. त्याच्या हाताखालीं **ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर** या नांवाचा अधिकारी असतो. जिल्ह्यांतील शाळांची परीक्षा घेणें, त्यांच्या कामावर देखरेख ठेवणें व नवीन शाळा काढणें इ० कामें या खात्याचीं आहेत. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरच्या मदतीस **सुपरवायझर** नांवाचे अधिकारी असतात. असे मदतीस असलेले अधिकारी आपल्या ज़िल्ह्यांत दहा आहेत. याशिवाय **सीनियर असि० डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर** या नांवाचा एक सरकारी अधिकारी असतो. स्कूलबोर्डाचे कारभारावर देखरेख ठेवणें हें त्याचें काम होय.

**६ इंजिनिअरिंग खातें**:—नवीन सडका, सरकारी इमारती, पूल बांधणें व जुन्यांची दुरुस्ती ठेवणें हीं कामें इंजिनिअरिंग खात्याचीं आहेत. या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास **एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर** असें नांव आहे. ह्याच्या हाताखालीं असि० इंजिनिअर व सब् इंजिनिअर हे अधिकारी असतात, व त्यांच्या हाताखालीं सुपरवायझर, ओव्हरसिअर वगैरे कामगार असतात.

शेतीच्या उपयोगासाठीं पाटबंधारे बांधणें, त्यांचें पाणी शेत-

कऱ्यांस देणें व शेतकऱ्यांकडून पाण्याची पट्टी वसूल करणें हीं कामें करण्यासाठीं इरिगेशन खातें आहे. **इरिगेशन खातें** हें इंजिनिअरिंग खात्याचा भाग आहे.

७ **टपाल खातें**:—ह्या खात्याचा मुख्य अधिकारी **सुपरिंटेंडेंट** हा आहे. या खात्याचें काम पत्रें, मनिआर्डरी, बंग्या आणणें व नेणें हें आहे. तारा पाठविण्याचें कामही पोस्टखातें करतें. यासाठीं ठिकठिकाणीं तारआफिसें आहेत. सातारा येथें जें मुख्य पोस्टआफिस आहे, तेथील अधिकाऱ्यास हेड् **पोस्टमास्तर** म्हणतात. जिल्ह्यांतील सर्व पोस्ट आफिसें याच्या ताब्यांत असतात. सुपरिंटेंडेंटचें काम या खात्यावर देखरेख ठेवणें हें आहे. त्याच्या मदतीस तीन **इन्स्पेक्टर्स** आहेत.

८ **वैद्यकखातें**:— रोग्यांना व आजारी लोकांना औषधपाणी देण्यासाठीं सातारा येथें एक मोठा दवाखाना आहे. त्यांच्यावरील अधिकाऱ्यास '**सिव्हिल सर्जन**' म्हणतात. जिल्ह्यांतील मोठमोठ्या गांवीं जे दवाखाने असतात, त्यांवर सिव्हिल सर्जनची देखरेख असते.

९ **आरोग्यखातें**:— लोकांच्या आरोग्यासाठीं मुलांना देवी काढणें, पिण्याचें पाणी स्वच्छ राखण्याची तजवीज करणें, साथीच्या रोगाच्या वेळीं इनॉक्युलेशन करणें व औषध पुरविणें वगैरे कामें या खात्याचीं आहेत. ह्यासाठीं जिल्ह्यांत **सॅनिटरी इन्स्पेक्टर** नांवाचा अधिकारी मुख्य असून त्याचे हाताखालीं **देवी डॉक्टर** नांवाचे कामगार असतात.

१० **जंगलखातें**:— जंगलें व कुरणें राखणें, जंगलांत नवीन झाडें लावणें व त्यांचें रक्षण करणें हीं या खात्याचीं कामें आहेत. राखलेल्या जंगलास 'फॉरेस्ट' म्हणतात. ह्या खात्यांत फॉरेस्ट रेंज ऑफिसर, राऊंड गार्ड वगैरे अधिकारी असतात.

११ **शेतकीखातें**:— पिकांची वाढ करणें, रोग नाहींसे कर-

ण्यासाठीं प्रयोग करणें, सुधारलेलीं औतें व खतें यांचें महत्व पटवून देणें, एकंदरींत शेती सुधारणें हा या खात्याचा मुख्य हेतु आहे. मुख्य अधिकारी **डिस्ट्रिक्ट ओव्हरसिअर** हा असून त्याच्या हाताखालीं **ओव्हरसिअर** असतात. याखेरीज प्राथमिक शाळांत शेतकी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून जिल्ह्यांत पेठ, काले, सुइंज, भिलवडी येथें क्लास सुरू केले आहेत.

---

# पाठ १९.

## म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें.

शहरांत स्वच्छता राखणें व शिक्षण, औषधोपचार वगैरे सार्वजनिक कामें पूर्वीं सरकार करीत असे. पण अशा कामाचें लोकांस शिक्षण मिळावें म्हणून शहरांत व मोठ्या गांवांत म्युनिसिपालिट्या स्थापन कराव्या असा कायदा सरकारनें केला आहे. त्या कायद्याप्रमाणें हल्लीं आपल्या जिल्ह्यांत सातारा, सातारासबर्बन, वाई, माळकमपेठ, पांचगणी, कऱ्हाड, इसलामपूर, अष्टें, तासगांव, विटें, रहिमतपूर व म्हसवड या ठिकाणीं म्युनिसिपालिट्या आहेत.

म्युनिसिपालिटीस बरींच कामें करावीं लागतात. मुलांच्या शिक्षणासाठीं प्राथमिक शाळा चालविणें, धर्मार्थ दवाखाना ठेवून गोरगरिबांस फुकट औषधें मिळण्याची सोय करणें, शहरांतील रस्ते स्वच्छ ठेवणें, गांवांतील घाण, पाणी व कचरा बाहेर नेऊन टाकणें वगैरे कामें म्युनिसिपालिटीस करावीं लागतात. जेथें पाण्याची सोय नसते तेथें स्वच्छ पाण्याचा पुरवठा म्युनिसिपालिटी करते. याशिवाय जन्ममरणाची नोंद ठेवणें, लहान मुलांना देवी काढणें, साथीचे रोग उत्पन्न झाल्यास त्यांवर योग्य उपाय योजणें इत्यादि कामें म्युनिसिपालिटी करिते.

वरील कामासाठीं लागणारा पैसा वसूल करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीला असतो. म्युनिसिपालिटी घरांच्या मालकांवर घरपट्टी; टांगेवाले, गाडीवाले, मोटारवाले ह्यांच्यावर चाकपट्टी आणि गांवांत येणाऱ्या मालावर जकात बसविते. शिवाय सरकार-कडून म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नाच्या दुप्पट मदत मिळते.

म्युनिसिपालिटीचा कारभार चालविण्यासाठीं एक कमिटी किंवा सभा असते. ह्या कमिटींतील सभासद गांवांतील घरपट्टी भरणाऱ्या लोकांनीं निवडून दिलेले असतात, व थोड्याशा सभासदांची नेम-णूक सरकारनें केलेली असते. म्युनिसिपालिटीची निवडणूक दर तीन वर्षांनीं होते.

म्युनिसिपालिटी शहरांत जें काम करते तींच कामें जिल्ह्यांत करण्यासाठीं ' लोकलबोर्ड ' नांवाची संस्था असते. ही संस्था जिल्ह्याचा कारभार पाहते म्हणून हिला जिल्हा लोकलबोर्ड म्हणतात. शिवाय तालुक्यातालुक्यांतून चालणाऱ्या कामावर देखरेख करण्यासाठीं तालुका लोकलबोर्डें असतात.

लोकांच्या शिक्षणासाठीं प्राथमिक शाळा चालविणें, शाळेच्या इमारती बांधणें, माणसांसाठीं व जनावरांसाठीं दवाखाने काढणें, विहिरी, तलाव, धर्मशाळा व बाजाराच्या जागा बांधणें हीं कामें लोकलबोर्ड करितें. शिवाय कांहीं जिल्ह्याबाहेर न जाणाऱ्या पक्क्या सडकांची व्यवस्था राखणें, पक्क्या सडका नसतील तेथें सडका तयार करणें, देवी काढणें, दुष्काळी कामें काढणें वगैरे कामें त्यास करावीं लागतात.

वरील कामांसाठीं लागणारा पैसा लोकलबोर्ड शेतकऱ्यांकडून वसूल करितें. शेतसाऱ्यावर दर रुपयामागें दोन आणे कर बसविला आहे. यास लोकलफंड म्हणतात. ह्याचा वसूल सरकारच जमीनमहसुलाबरोबर करून देते. शिवाय नावा, नाकीं, दस्तुऱ्या,

दगडाच्या खाणी व कोंडवाडा यांपासूनही लोकलबोर्डास पैसा मिळतो व सरकारकडून सर्व रकमेच्या $\frac{2}{3}$ इतकी रक्कम मदत म्हणून मिळते.

म्युनिसिपालिटीप्रमाणेंच लोकलबोर्डाचा कारभार पाहणारी एक सभा असते. हिचे बहुतेक सभासद लोकलफंड भरणाऱ्या लोकांनीं आपल्यातर्फे निवडून दिलेले असतात; आणि थोड्या सभासदांची नेमणूक सरकारकडून होते. आपल्या जिल्ह्यांतून लोकांतर्फे २७ सभासद निवडून येतात व सरकारनियुक्त ९ मिळून एकंदर ३६ सभासदांचें बोर्ड असतें. हें बोर्ड आपल्या पसंतीनें १४ सभासद निवडून स्कूलबोर्ड बनवितें. त्यांत सर्व जातींचे प्रतिनिधि नसल्यास सरकार आणखी ३ सभासद निवडतें. सरकारनियुक्त ३ सभासद मिळून १७ सभासदांचें स्कूलबोर्ड असतें. या सभासदांनीं आपल्यांतूनच चेअरमन वगैरे अधिकारी नेमावयाचे असतात. हें स्कूलबोर्ड शिक्षणाविषयक सर्व काम पाहतें. स्कूलबोर्डाची दर महिन्यास बैठक भरून तींत सर्व कामांचा निवाडा केला जातो. शाळांचें प्रत्यक्ष काम पाहाण्यासाठीं सरकारच्या संमतीनें एक अधिकारी स्कूलबोर्ड नेमितें. त्याला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्हणतात.

# विशेष वर्णन.

---:o:---

## पाठ २० वा.

### वाई तालुका.

हा तालुका जिल्ह्याच्या उत्तरबाजूला आहे. शंभू महादेवाच्या डोंगराची रांग व कमळगड फाटा या तालुक्यांत असून, सह्य

पर्वतास लागून हा तालुका असल्यामुळें यांत डोंगर फार आहेत. पश्चिम बाजूस डोंगर जास्त असून पूर्वेकडे त्यांपेक्षां कमी आहेत; त्यामुळें पश्चिम बाजूस पिकांस उपयोगी अशी जमीन कमी असून पूर्वेकडे वाढत गेली आहे. कृष्णानदी या तालुक्यांतून वाहते. तिच्या कांठची जमीन तालुक्यांतील इतर भागापेक्षां बरीच पिकाऊ आहे. पश्चिमबाजूस पाऊस जास्त पडतो, म्हणून त्या ठिकाणीं तांदूळ फार पिकतो. याशिवाय वरी, नाचणा, सावा, घेवडा, बटाटा हीं पिकें होतात. पूर्वबाजू व वाईपासून पुढचा कृष्णाकांठ यांत शाळू, हरभरा, बाजरी, गहू, बटाटे, कांदे हीं मुख्य पिकें होतात.

वाई हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. या ठिकाणीं मामलेदार, राजिस्ट्रार, फौजदार, लोकलबोर्ड इत्यादिकांच्या कचेऱ्या आहेत. म्युनिसिपालिटी आहे. हा गांव कृष्णा कांठावर वसला आहे. नदीला मोठाले घाट असून देवळेंही पुष्कळ आहेत. हें पवित्र क्षेत्र असल्यामुळें ब्राह्मण लोकांची वस्ती फार आहे. श्रीविष्णु व गजानन यांचीं प्रसिद्ध स्थानें आहेत. सृष्टिसौंदर्यामुळें हा गांव फार रम्य दिसतो. येथें मनुष्याकरितां व जनावराकरितां धर्मार्थ दवाखाने आहेत. याशिवाय मिशनरींचा मोठा दवाखाना आहे. मिरजेच्या दवाखान्याच्या खालोखाल याची प्रसिध्दि आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें**—वाई, बावधन, भुईंज, ओसडें, उडतरें, पांचवड, चिंधवली, सुरूर, कवठें, शिरगांव, किकली, पांचगणी व खंडाळें.

**किल्ले:**—पांडवगड, कंजळगड ( पूर्वीचें नांव रुद्रगड ) व वैराटगड.

**मालाविषयीं प्रसिध्द ठिकाणें**—कवठें व बावधन येथें लुगडीं चांगलीं तयार होतात; धावडी, वरवडी, अटीट हीं पश्चिम भागांतील गांवें उत्तम तांदुळाविषयीं प्रसिध्द आहेत. शिवाय बटाटेही

उत्तम होतात. पांचगणी हें हवा खाण्याचें ठिकाण आहे. धौम येथें नरसिंहाचें स्थान आहे.

या तालुक्यांतील व्यापाराची मुख्य पेठ 'वाई' हें आहे. येथें पश्चिम बाजूच्या तांदुळाचा व्यापार पुष्कळ आहे.

वाई हें गांव पांडवांच्या वेळचीं 'विराटनगरी' असून विराट राजाचा वैराटगड किल्ला, पांडवांचा राहण्याचा पांडवगड किल्ला, द्रौपदीसाठीं ज्या ठिकाणीं कीचकाचा वध झाला ती किचक टेकडी हीं ठिकाणें आहेत.

---

# पाठ २१ वा.

## सातारा तालुका.

हा तालुका वाई तालुक्याच्या दक्षिणेस आहे. पश्चिमेस सह्याद्रि असून त्याचे फाटे तालुक्यांतून पसरले आहेत. तालुक्याचा पश्चिम भाग जास्त डोंगराळ आहे. कृष्णानदी पूर्व सरहद्दीवरून वाहते. कृष्णाकांठ सुपीक आहे. वेण्णानदीचें वेण्णा खोरें व उरमोडी नदीचें परळखोरें हींहि बरींच पिकाऊ आहेत. पावसाचें मान पश्चिमेकडे जास्त असल्यामुळें तेथें तांदूळ, वरी, नाचणी हीं पिकें होतात. बाकीच्या भागांत शाळू, अरगड, गहूं, हरभरा, बाजरी, हीं मुख्य पिकें आहेत. नागठाणें व बोरगांव या बाजूला 'आलें' फार होतें.

सातारा हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार रजिस्ट्रार, फौजदार, ता० लोकलबोर्ड यांचीं ऑफिसें आहेत. हें शहर जिल्ह्याचेंही मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें कलेक्टर, प्रांतसाहेबांचीं ऑफिसें, डि. लोकलबोर्ड व एज्यु० ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांचीं ऑफिसें, डि० पोलीस ऑफिस, जज्जकोर्ट, देवी

डॉक्टर, हेड पोस्ट ऑफिस, शेतकी ओव्हरसिअर इत्यादि सरकारी ऑफिसें आहेत. शहरचें आरोग्य व शिक्षण यांसाठीं म्युनिसिपालीटी आहे. म्युनिसिपालिटीनें आपल्या हद्दींत सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू केलें आहे. इंग्रजी शिक्षणासाठीं हायस्कूल व न्यू इंग्लिश स्कूल या दोन शाळा आहेत. जिल्ह्यांतील शिक्षण घेणाऱ्या मुलांची राहण्याजेवणाची सोय करण्यासाठीं मराठा बोर्डिंग व छत्रपति शाहू बोर्डिंग अशीं दोन बोर्डिंगें आहेत. मराठा बोर्डिंगमध्यें फक्त मराठ्यांच्याच मुलांना घेण्यांत येतें. येथें राहणाऱ्या मुलांना स्वतःचे खर्चानें राहावें लागतें. शाहूबोर्डिंगमध्यें सर्व जातींच्या विद्यार्थ्यांचा समावेश होतो. यांत बरेच विद्यार्थी ' फ्री ' असून कांहीं त्यांच्या ऐपतीप्रमाणें निम्फ्री व सर्व खर्च देऊन आहेत. या बोर्डिंगाचे मे. भाऊराव पाटील हे उत्साही व कळकळीचे चालक आहेत.

हा गांव पूर्वी मराठ्यांची राजधानी म्हणून प्रसिद्ध होता, पहिलें छत्रपति शाहू महाराज यांनीं सातारा शहर वसविलें. माचीला त्यांचा ' रंगमहाल ' हा राजवाडा होता. थोड्या वर्षांपूर्वी तो जळाल्यामुळें हल्लीं पाया व चौथरे शिल्लक आहेत. त्यांपैकीं फक्त तीन मजली लहानशी इमारत शिल्लक आहे. त्यांच्यानंतरच्या राजांनीं बांधलेले जुना व नवा वाडा, जलमंदीर, देवीचें देऊळ ह्या मोठ्या इमारती आहेत. अदालतीचा वाडा व इतर सरदार लोकांचे मोठमोठे वाडे आहेत. साताराचा किल्ला चांगला बळकट असून त्यावर ताराबाई राणीसाहेब यांचा दरबारचा वाडा चांगल्या स्थितींत आहे. गांवांत पाणीपुरवठ्यासाठीं पूर्वी खापरी नळानें पाणी आणिलें होतें. हल्लींही कास येथील तलावांतून दुसरा पाट काढून पाणी आणलें आहे. महारदऱ्यांत पाणी सांठविण्यासाठीं मोठें तळें बांधिलें

आहे. येथें मनुष्यांकरतां मोठा दवाखाना आहे. जनावरांकरितांही मोफत दवाखाना आहे. सातारा कँप म्हणून साताराच्या पूर्वबाजूस एक भाग आहे, तेथें म्युनीसिपालिटी आहे मिशनरी लोकांची वस्ती व त्यांच्या शाळा या भागांतच आहेत. सैन्यास राहण्यासाठीं बराकी आहेत. सातारा ही व्यापाराची पेठ आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—सातारा, लिंग, वडूथ, क्षेत्रमाहुली, परळी, शाडळी, अंगापूर, तासगांव, अतीत.

**देवस्थानें:**—परळी येथें रामदास स्वामींची समाधी असून माघ व॥ ९ ला मोठा उत्सव होतो. यवतेश्वर येथें यवतेश्वर, धावडशी येथें ब्रह्मेंद्रस्वामींची समाधि आहे. गोवें येथें कवठेश्वराचें स्थान आहे.

**किल्ले:**—सातारा ऊर्फ अजिमतारा, सज्जनगड.

या तालुक्यांत एकंदर १५१ गांवें असून त्यांपैकीं ११० खालसा व ४१ इनाम आहेत. लोकसंख्या १११८९८ असून प्राथमिक शिक्षणाच्या ७९ शाळा आहेत.

सातारा येथील प्रायमरी शाळा सातारा म्युनिपालिटीच्या ताब्यांत आहेत.

४०८४

---

## पाठ २२ वा.

—:०:—

### कोरेगांव तालुका.

वाई व सातारा या तालुक्यांच्या पूर्वेस हा तालुका आहे. पश्चिम व पूर्व सरहद्दीवर डोंगरांची ओळ आहे. वसन्त नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते म्हणून उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. जमीन सपाट असून काळी आहे. पाऊस पिकांना पुरेसा पडत असल्यामुळें हा तालुका बराच सुपीक आहे. रेवडी येथें

वसन्त नदीस धरण धरून शेतीस पाणीपुरवठा केला आहे. शाळू, भुइमूग, हरभरा, बाजरी, बटाटा हीं मुख्य पिकें होत. वाठार स्टेशनच्या आसपास बटाटा फार होतो.

कोरेगांव हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार, रजिस्ट्रार, फौजदार यांच्या कचेऱ्या आहेत. न्यायकोर्ट आहे, तें कांहीं दिवस येथें व कांहीं दिवस दहिवडीस असतें. खटाव व माण या तालुक्यांतून येणाऱ्या सडकांच्या मुखाशीं हा गांव असून रेल्वे स्टेशन आहे. त्यामुळें या दोन्ही तालुक्यांतील व्यापार व रहदारी या ठिकाणाहून होते. कोरेगांवचा व्यापार फार मोठा आहे. मोटारींची सोय झाल्यामुळें माण व खटाव तालुक्यांतील प्रवास सुखकर झाला आहे. येथें शेंगा फोडण्याच्या ५।७ गिरण्या आहेत.

रेल्वेचा फाटा दक्षिणोत्तर तालुक्याच्या मध्यांतून गेल्यामुळें व्यापारी दृष्टीनें हा तालुका इतर सर्व तालुक्यांपेक्षां जास्त महत्त्वाचा आहे. लोणंद, आदर्की, साल्पें, वाठार, पळशी, सातारारोड, कोरेगांव, रहिमतपूर व तारगांव हीं उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रमानें स्टेशनें आहेत. लोणंद येथून कांदे फार रवाना होतात. फलटण संस्थानांत येथूनच रहदारी व व्यापार सुरू होतो. वाठारहून बटाटा फार रवाना होतो. वाई व महाबळेश्वर या ठिकाणीं येथून रहदारी व व्यापार चालतो. सातारारोड येथून साताराशीं व्यापार व रहदारी होते. कोरेगांवहून शेंगदाणे व धान्य रवाना होतें व खटाव तालुका व माणपेटा इकडे व्यापार व रहदारी सुरू होते. रहिमतपूरहून शेंगदाणे व धान्य रवाना होतें व औंध या पंतप्रतिनिधींच्या मुख्य ठिकाणीं रहदारी व व्यापार होतो. तारगांवहून नागवेलीचीं पानें रवाना होतात. सातारा जिल्ह्याच्या जवळ

जवळ निम्या भागाचा व्यापार व दळणवळण या तालुक्यांतून झाल्यामुळें याला महत्त्व आलें आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—कोरेगांव, लोणंद करंजखोप, सोनकें, पिंपोडें-बु॥, वाघोली, देऊर, रेवडी, स्टेशन पाडळी, चिमणगांव, शिरढोण, रहिमतपूर, आर्वी, किरोली व तारगांव. यांशिवाय औंधकरांचे ताब्यांतील किन्हई व कुरुंदवाडकरांचे ताब्यांतील कुमठें हीं मोठीं गांवें आहेत.

चिमणगांव व आर्वी ह्या ठिकाणीं नागवेलीचीं पानें होतात.

**दवाखानेः**—कोरेगांव येथें मनुष्यांकरतां व रहिमतपूर येथें मनुष्यांकरतां व जनावरांकरतां धर्मार्थ दवाखाने आहेत.

**देवस्थानें:**—किन्हई येथें देवीचें स्थान आहे. जरंड्याचे डोंगरावर बजरंगाचें स्थान आहे. निगडी येथें रंगनाथ स्वामींची समाधि आहे.

**किल्ले:**—चंदन, वंदन, नांदगिरी.

सातारारोड येथें 'दी कूपर इंजिनिअरिंग वर्क्स' नांवाचा कारखाना आहे. येथून लोखंडी नांगर, चरक, कडबा कापण्याचीं यंत्रें इत्यादि लोखंडाचे जिन्नस परठिकाणीं जातात.

---

# पाठ २३ वा.

## खटाव तालुका.

कोरेगांव तालुक्याचे पूर्व बाजूस हा तालुका आहे. पश्चिम व पूर्व सरहद्दीवर डोंगरांची रांग आहे. तालुक्याचा बहुतेक भाग सपाट असून, पश्चिमेकडे माळरान कमी असून पूर्वेकडे माळरान जास्त आहे. येरळा नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते, म्हणून तालु-

क्याचा उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. पश्चिमेकडून येणारा पाऊस पश्चिम आंगास बराच पडत असल्यामुळें तिकडे खरिपाचीं पिकें चांगलीं होतात. पूर्वेकडे कमी पडत असल्यामुळें खरिपाचीं पिकें बेताचीं होतात. १०।१२ वर्षांपूर्वी हा पाऊस या भागांत बराच पडत होता पण अलीकडे तो कमी झाला आहे. पूर्वेकडून येणारा पाऊस या तालुक्यांत बराच पडतो. पूर्वभागचीं पिकें या पावसावरच जास्त अवलंबून आहेत. येरळा नदीस नेर येथें तलाव व खातगूण येथें धरण धरून शेतीस पाणीपुरवठा केला आहे. पूर्व बाजूस विहिरी जास्त आहेत. त्यांवर लोक पिकें काढतात. पाऊस फार कमी पडतो त्यावेळीं विहिरींच्या पाण्यावर पीक काढून दुष्काळापासून बरेच लोक बचाव करतात. शाळू, बाजरी, गहूं, हरभरा मुईमूग, गिडगाप हीं मुख्य पिकें होत. शिवाय पाटाचे पाण्यावर बटाटा व विहिरींचे पाण्यावर बराच ऊस होतो.

वडूज हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण असून तेथें, मामलेदार, फौजदार, रजिस्ट्रार, ता० लो० बोर्ड यांच्या कचेऱ्या आहेत. मनुष्यें व जनावरें यांच्यासाठीं धर्मार्थ दवाखाने आहेत. पुसेसावळी येथें मनुष्यांकरतां मोफत दवाखाना आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें**:—डिसकळ, बूध, पुसेगांव, खातगूण, खटाव, कुरोली, वडूज, कातरखटाव, कलेढोण, मायणी, चितळी, पुसेसावळी, वडगांव. यांशिवाय वरूड व पळसगांव हीं लहान गांवें असून तेथें पोस्ट आहे.

**देवस्थानें**—ललगूण येथें नागनाथाचें स्थान असून श्रावण सोमवारीं मोठी यात्रा भरते. खातगूण येथें पीर असून फाल्गुन व॥ ११ स मोठा उरुस भरतो, त्यावेळीं येथें भक्तलोक बकरीं फार मारतात. कुरोली येथें सिद्धेश्वराचें स्थान आहे. पिंडींतून सिंहनाद होत असतो; म्हणून याला शंकराच्या जागृत

स्थानापैकीं समजतात. श्रावण सोमवारीं यात्रा भरते. वडगांव येथें जयरामस्वामी नांवाचे साधु पुरुष होऊन गेले त्यांची समाधी आहे. मायणी येथील संगमेश्वराचें देऊळ व कातरखटाव येथील कात्रेश्वराचें देऊळ हीं पूर्वीच्या काळचें दगडी व कोरीव काम या दृष्टीनें पाहाण्यासारखीं आहेत.

किल्लेः—वर्धनगड व भूषणगड.

मायणी व कलेढोण येथें रेशीमकांठी उपरणीं व धोतरजोडे तयार होतात. मेंढरें पुष्कळ असल्यामुळें त्यांच्या लोंकरीपासून पुष्कळ घोंगड्यां तयार होतात. येथील घोंगड्या कोकणांत विक्रीसाठीं जातात.

या तालुक्यांत एकंदर ८५ गांवें असून ५४ खालसा व ३१ इनाम आहेत. लोकसंख्या ७९४२४ असून प्रायमरी शाळा ७८ आहेत.

इंग्रजी शिक्षणाची शाळा या तालुक्यांत नसल्यामुळें इंग्रजी शिक्षणासाठीं सातारा, पुणें, कोल्हापूर इकडे जावें लागतें.

---

# पाठ २४ वा.

## माण पेटा.

खटाव तालुक्याच्या पूर्व बाजूस हा पेटा आहे. माण पेटा हा पूर्वी स्वतंत्र तालुका होता; पण सरकारनें एप्रील १९२८ पासून पेटा केला आहे. पेटा केल्यामुळें मामलेदाराऐवजीं महालकरी हा अधिकारी आहे. बाकी सर्व अधिकारी पूर्वीचेच आहेत. या पेटयाचे सरहद्दीवर डोंगरांची रांग असून मध्यंतरीं टेकड्या व दऱ्या आहेत. वायव्य बाजूस डोंगर बरेच असून तेथून माण नदी निघते. ती आग्नेयीकडे वाहात जाते म्हणून उतार वायव्येकडून आग्नेयीकडे

आहे. या तालुक्यांत माळरान फार आहे. करल जमीन ठिकठिकाणीं विशेषतः माणगंगेच्या कांठीं बरीच आहे. दऱ्या व ओढ्यांच्या कांठच्या जमिनी पिकास उपयोगी आहेत. लहान लहान ओढ्यांस मोठमोठ्या ताली घरून पिकास उपयोगी जमीन तयार केली आहे. माणनदी व ओढे यांच्या आजूबाजूस विहिरी बऱ्याच आहेत. विहिरींना पाणी भरपूर लागतें. पश्चिमेकडून येणारा पाऊस फार थोडा पडतो. पूर्वेकडून वळिवाचा येणारा पाऊस बराच पडतो. मृगनक्षत्राचे अगोदर जो वळिवाचा पाऊस पडतो त्यावर बाजरी पेरली जाते. बाजरी, खपली, व्हंडी, रातांळीं हीं या पेट्यांतील मुख्य पिकें आहेत. जमीन कमी सुपीक म्हणून लोकवस्ती फार विरळ आहे. बऱ्याच ठिकाणीं डाळिंबाच्या बागा आहेत. राणंद येथील डाळिंबें मोठीं व चवदार असतात. चराऊ जमीन फार असल्यामुळें मेंढरें पाळण्याचा धंदा जोराचा आहे. खिलारी गाईबैलांची पैदासही उत्तम होते.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—दहिवडी, गिरवी, शिंगणापूर, मलवडी, गोंदवलें बु॥, म्हसवड.

दहिवडी हें या पेट्याचें मुख्य ठिकाण असून येथें महालकरी, रजिष्ट्रार, फौजदार, ता० लो० बोर्ड यांच्या कचेऱ्या आहेत. म्हसवडास फौजदार कचेरी आहे. दहिवडी व म्हसवड येथें मनुष्यांकरितां धर्मार्थ दवाखाना आहे.

**देवस्थानें:**—शिंगणापूर येथें शंभूमहादेवाचें स्थान आहे. शंभूमहादेवाच्या देवळाचें कोरीव काम उत्तम प्रतीचें आहे. चैत्र शु. ११ स मोठी यात्रा भरते; शिवाय दर श्रावण सोमवारीं व महाशिवरात्रीसही यात्रा भरते. मलवडी येथें खंडोबाचें स्थान आहे. म्हसवड येथें म्हसवडसिद्धाचें स्थान आहे. कार्तिक व॥ अमावस्येस येथें मोठी यात्रा भरते. यावेळीं गुरांचा मोठा बाजार भरतो.

मार्गशीर्ष शु॥ पौर्णिमेस म्हसवडच्या पश्चिमेस नागोबा म्हणून स्थान आहे तेथें गुरांचा मोठा बाजार भरतो. गोंदवलें बु० येथें गणूबुवांची समाधि आहे.

लोकरीची पैदास फार होत असल्यामुळें घोंगड्या विणण्याचा धंदा मोठ्या प्रमाणांत चालतो. म्हसवड, दहिवडी व महिमानगड हीं घोंगड्यांच्या व्यापाराचीं प्रमुख ठिकाणें आहेत. कोंकणाशीं घोंगड्यांचा व्यापार चालतो. प्रतिवर्षी २।३ लाख रुपयांची घोंगडीं बाहेर पाठविलीं जातात. म्हसवड येथें लुगडीं व पासोड्या तयार होतात म्हसवड ही व्यापाराची मोठी पेठ आहे.

म्हसवड येथें दर बुधवारीं व गोंदवलें येथें दर गुरुवारीं गुरांचा मोठा बाजार भरतो.

किल्ले:—ताथवडा, वारूगड, संतोषगड, महिमानगड.

या पेठ्यांत एकंदर, ७७ गांवें असून त्यापैकीं ७२ खालसा व ५ इनाम आहेत. लोकसंख्या ५५११८ असून प्रायमरी शाळा ४८ आहेत.

---

# पाठ २५ वा.

## खानापूर तालुका.

खटाव तालुक्याच्या दक्षिणेस हा तालुका आहे. पश्चिम सरहद्दीवर डोंगरांची रांग आहे. विट्यापासून पूर्वेकडील भागांत बरेच डोंगर आहेत. पश्चिम बाजूस माळरान बेताचें आहे; पण पूर्वेकडे फार आहे. येरळा नदी व नान्नी नदी या उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. खानापुराकडील ओढेही याच दिशेनें वाहातात; म्हणून या तालुक्याचा उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. पश्चिमेकडे पाऊस बराच पडतो. पूर्वेकडे वळिवाचा पाऊस बराच पडतो.

तालुक्याचा पश्चिमभाग पूर्वभागापेक्षां जास्त पिकाऊ आहे. गिडगाप, ड्डुकरी, भुइमूग, उडीद, बाजरी, हरभरा हीं मुख्य धान्यें आहेत. नान्नी नदीचे कांठीं पानमळे फार आहेत. खानापूरच्या आसपास गहू चांगला होतो.

विटें हें तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार, रजिस्ट्रार, फौजदार, ता० लो० बोर्ड यांच्या कचेऱ्या असून न्यायकोर्ट आहे. हें न्यायकोर्ट तासगांव व विटें येथें फिरतें असतें. पूर्वी या गांवाला पाण्याचा फार तुटवडा होता; पण नुकताच ४ । ५ वर्षांपूर्वी जमिनीखालून जाणारा पाण्याचा मोठा नळ सांपडल्यामुळें भरपूर पाणी झालें आहे. हें पाणी आरोग्यकारक आहे. येथें मनुष्यांकरितां धर्मार्थ दवाखाना आहे. कडेगांव येथें फौजदार कचेरी आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें**:—कडेगांव, तडसर, वांगी, देवराष्ट्रे, विटें, पारें, खानापूर.

**देवस्थानें**:—रेणावी येथें रेवणसिद्धाचें स्थान आहे. नऊ नाथांपैकीं हे एक आहेत. पळशी येथें डोंगरांत शुकाचार्यांचें स्थान आहे. शुकाचार्य ब्रह्मचारी असल्यामुळें स्त्रियांचें दर्शन होऊं नये म्हणून त्यांचें तोंड डोंगरांत व पाठ बाहेर आहे. लेंगरें येथें पीर आहे. देवराष्ट्रें येथें सागरेश्वर असून श्रावण सोमवारीं यात्रा भरते. कडेगांव व तडसर येथें मोठे ताबूत करतात.

**उद्योगधंदे**:—कडेगांव येथें लुगडीं व पासोड्या विणतात. तडसर येथें लुगडीं विणतात. पूर्वेकडे मेंढरें वरींच आहेत म्हणून तिकडे घोंगड्या विणण्याचा धंदा चालतो. विटें येथें गुरांचा बाजार भरतो.

या तालुक्यांत एकंदर ९० गांवें असून त्यांपैकीं ६९ खालसा व २१ इनाम आहेत. लोकसंख्या ७४१७४ असून प्रायमरी शाळा ९० आहेत.

# पाठ २६ वा.

## तासगांव तालुका.

खानापूर तालुक्याच्या दक्षिणबाजूस हा तालुका आहे. या तालुक्याच्या पूर्वबाजूस थोडेसे डोंगर आहेत. बाकीच्या भागांत डोंगर मुळींच नाहींत. कृष्णा, येरळा व अघहरणा ( अग्रण ) या तालुक्यांतून वाहातात. उतार दक्षिणेकडे आहे. कृष्णाकांठ चांगला सुपीक असून येरळा कांठ बराच सुपीक आहे. पूर्वेकडे माळरान बरेंच असल्यामुळें तो वरील भागांइतका सुपीक नाहीं. पश्चिमेकडून येणारा पाऊस पश्चिम बाजूस साधारण पडतो व पूर्वेकडे फार कमी पडतो. पूर्वेकडून येणारा पाऊस सर्व तालुक्यांत बराच पडतो. गिडगाप, डुकरी, शाळू, कापूस, तंबाखू, बाजरी हीं मुख्य पिकें होत.

तासगांव हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार, राजिस्ट्रार, फौजदार, शेतकी ओव्हरसिअर यांच्या कचेऱ्या आहेत. न्यायकोर्ट आहे. तें विटें व तासगांव या ठिकाणीं फिरतें असतें. मनुष्यांकारितां व जनावरांकारितां येथें दवाखाने आहेत. तासगांव ही मोठी व्यापारी पेठ आहे. मराठेशाहींत सरदार पटवर्धन यांचें राहाण्याचें हें मुख्य ठिकाण होतें. गोपूर व गणपतीचें देऊळ हीं पाहण्यासारखीं आहेत. परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं भिलवडी येथें कृष्णा नदीस फार नमुनेदार घाट बांधला आहे. नदीवर दोराची नाव आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—तासगांव, पलूस, भिलवडी, अंकलखोप, चिंचणी सोनी, भोसें, सावळज, येळावी, बुरली, एरंडोली, विसापूर.

पलूस येथें लुगडीं व सुताच्या पोत्यांसाठीं पट्टया विणतात. सावळज येथें मनुष्यांकरितां धर्मार्थ दवाखाना आहे.

देवस्थानें:—औदुंबर येथें श्री दत्तात्रयाचें स्थान आहे. माघ व॥ ५ स मोठी यात्रा भरते.

या तालुक्यांत एकंदर ४९ गांवें असून त्यांपैकीं ३७ खालसा व १२ इनाम आहेत. लोकसंख्या ७८८२६ असून प्रायमरी शाळा ८९ आहेत.

---

# पाठ २७ वा.

## वाळवें तालुका व शिराळे पेटा.

सातारा जिल्ह्याच्या दक्षिणेस हा तालुका आहे. तालुका मोठा असल्यामुळें सरकारनें कामाच्या सोयीसाठीं पश्चिमेकडील डोंगराळ भाग वेगळा करून शिराळे पेटा केला आहे. शिराळे पेट्यांत पश्चिमभागीं सह्यपर्वत आहे व त्याचे फाटे पूर्वेकडे पसरले आहेत. हा पेटा फार डोंगराळ आहे. सपाट व चांगली पिकाऊ जमीन फार कमी आहे. पश्चिमेकडून येणारा पाऊस फार पडतो. झाडी फार आहे म्हणून पावसाळ्यांत हवा रोगट होते. दक्षिणहद्दीवरून वारणा नदी वाहते. तांदूळ हें या पेट्यांतील मुख्य पीक आहे. या पेट्या-शिवाय बाकीचा जो भाग राहिला त्यांत डोंगर फार कमी आहेत. मल्लिकार्जुनाचा डोंगर हा एक प्रसिद्ध डोंगर आहे. दक्षिण सरहद्दी-वरून वारणा व पूर्वबाजूस कृष्णानदी वाहते. काळी व कसदार अशी जमीन पुष्कळ आहे. पाऊस बराच पडतो. गिडगाप, डुकरी, तंबाखू, भुइमूग, कापूस हीं मुख्य पिकें आहेत. बागाईत जमिनींत ऊस, हळद, पानमळे आहेत.

इसलामपूर हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार, रजिस्ट्रार, फौजदार यांच्या कचेऱ्या असून ता० लो० बोर्ड सहकारी सोसायटी यांचीं ऑफिसें आहेत, न्यायकोर्ट व म्युनिसिपालिटी आहे. या गांवाला पाण्याची फार टंचाई आहे. म्युनिसिपालिटीनें पाण्याचा सांठा होण्यासाठीं बरींच तळीं बांधलीं आहेत. तरी पण पाऊसकाळ कमी झाल्यावर पाणीपुरवठा होत नाहीं. जनावरांकरतां व मनुष्यांकरतां धर्मार्थ दवाखाने आहेत. अमेरिकन मिशनचा डॉ० एलिस यांनीं मोठ्या प्रमाणावर दवाखाना चालविला आहे. (हे डॉक्टर आठवड्यांतून एकएक दिवस शिराळें व मल्हारपेठ येथें जाऊन औषधपाणी देतात.) हें गांव या भागांतील व्यापाराची मुख्य पेठ आहे. येथें दर गुरुवारीं जनावरांचा बाजार भरतो.

शिराळें हें शिराळे पेट्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें महालकरी, फौजदार यांच्या कचेऱ्या आहेत.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें**:—कासेगांव, नेर्लें, रेठरें हर्णाक्ष, बोरगांव, इसलामपूर, पेठ, रेठरें धरणाचें, वाळवें, कामेरी, एलूर, चिकुर्डें, ऐतवडें बु॥, अष्टे, बागणी, दुधगांव, ताकारी; व शिराळें पेट्यांतील शिराळें, मांगलें, बिळाशी व अरळें.

**देवस्थानें**:—मच्छिंद्रगड येथें मच्छिंद्रनाथ व शिराळें येथें गोरखनाथ आहे. हे नऊ नाथांपैकीं असून मच्छिंद्रनाथ हे गोरखनाथांचे गुरु आहेत. बहें येथें कृष्णा नदींत बेटावर रामालिंग आहे. राम वनवासांत असतांना कांहीं दिवस अत्री ऋषींच्या आश्रमांत येथें होते. येडें निपाणी येथें मल्लिकार्जुनाचें स्थान आहे. बारा लिंगांपैकीं हें एक लिंग आहे. श्रावण सोमवारीं येथें यात्रा भरते. उरुण येथें पीर, नरसिंगपूर येथें नरसिंहाचें स्थान आहे.

**मालाविषयीं प्रसिद्ध ठिकाणें**:—पेठ, नेर्लें, इसलामपूर, दुधगांव या ठिकाणीं लुगडीं व पांढरें कापड विणतात. बागणी येथें उत्तम अडकित्ते तयार होतात. कासेगांव, पेठ, रेठरें धरणाचें, ऐतवडें बु॥

या टापूंत पानमळे पुष्कळ आहेत. हीं पानें मुंबईस पाठवितात. तंबाखूचें उत्पन्न सर्व तालुक्यांत पुष्कळ होतें.

अष्टें येथें म्युनिसिपालिटी व दवाखाना आहे.

**किल्ले:**—मच्छिद्रगड व प्रचितगड.

या तालुक्यांत एकंदर १३७ गांवें असून ९५ खालसा व ४२ इनाम आहेत. लोकसंख्या १६०१२९ असून प्रायमरी शाळा १६१ आहेत.

---

# पाठ २८ वा.

## कऱ्हाड तालुका.

वाळवें तालुक्याच्या उत्तरेस हा तालुका आहे. पूर्व व पश्चिम बाजूस डोंगर बरेच आहेत. कऱ्हाडजवळ आगाशिवाचा डोंगर आहे. त्यांत पांडवांनीं कोरलेलीं कोरीव लेणीं आहेत. तालुक्याच्या मध्यांतून कृष्णा नदी वाहाते. कृष्णा नदीस पश्चिम बाजूकडून तारळी, उत्तरमांड, कोयना, वांग, दक्षिणमांड या नद्या मिळतात. नद्या पुष्कळ असल्यामुळें या तालुक्यांतील पुष्कळ जमीन सुपीक आहे. कृष्णा नदीस खोडशी गांवाजवळ धरण धरून पाटानें शेतीस पाणी नेलें आहे. हा पाट कृष्णा नदीच्या पूर्व बाजूनें नेला आहे. या पाटावर ऊस व हळद यांचें पीक फार होतें. पश्चिमेकडून येणारा पाऊस व वळिवाचा पाऊस हे पिकांना पुरेसे इतके पडतात. शाळू, हरभरा, तंबाखू, ऊस, हळद हीं मुख्य पिकें होत.

कऱ्हाड हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार फौजदार, रजिस्ट्रार यांच्या कचेऱ्या आहेत. ता० लो० बोर्ड, शेतकी ओव्हरसिअर यांचीं ऑफिसें, न्यायकोर्ट व म्युनिसिपालिटी

आहे. मनुष्यांकरितां व जनावरांकरितां धर्मार्थ दवाखाने आहेत. कृष्णा व कोयना या नद्यांचा येथें प्रीतिसंगम झाला आहे. हिंदु लोक याला पवित्र ठिकाण मानतात. श्रावण महिन्यांत पुष्कळ भाविक हिंदु लांब ठिकाणांहून संगमावर स्नानास येतात. तसेंच इतर पर्वकाळींही येतात. येथील मनोरे फारच उंच असून पाहण्यासारखे आहेत. कऱ्हाड हें व्यापाराचें मोठें ठिकाण आहे. जिल्ह्यांतील प्रमुख व्यापाराच्या पेठांपैकीं ही एक पेठ आहे. येथील व्यापार फार मोठा आहे. भुइमुगाच्या शेंगा फोडण्याच्या गिरण्या बऱ्याच आहेत. सातारा, कोल्हापूर, चिपळूण व स्टेशन यांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर हा गांव असल्यामुळें रहदारी फार आहे. बरीचशी रहदारी मोटारींतून होते. कापड विणण्याची एक गिरणी आहे. टिळक स्कूल नांवाची एक इंग्रजी शिक्षणाची शाळा आहे. दर गुरुवारीं येथें जनावरांचा बाजार भरतो.

या तालुक्यांतून रेलवे दक्षिणोत्तर गेली आहे. मसूर, शिरवडें, कऱ्हाड, शेणोली हीं स्टेशनें आहेत. मसूर स्टेशनवरून शेंगा व शेंगदाणे पुष्कळ रवाना होतात. कऱ्हाड स्टेशनवरून, शेंगा, शेंगदाणे, गूळ, हळद, हीं फार रवाना होतात. पाटण तालुका, बराचसा कऱ्हाड तालुका व खानापूर तालुका इकडील लोकांची रहदारी या स्टेशनवरून होते. ओगलेवाडी येथील कांचसामान व प्रभाकर कंदील येथून पराठिकाणीं रवाना होतात. शेणोली स्टेशनवरून गूळ फार रवाना होतो.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—पाल, उंब्रज, चरेगांव, मसूर, कऱ्हाड, कार्वें कोळें, वडगांव, काले, ओंड, शेणोली, रेठरें बु॥, शिरगांव, कोळेवाडी.

**देवस्थानें:**—पाल येथें खंडोबाचें स्थान आहे. कोळें येथें वाडगेबुवांची समाधि आहे.

उंब्रज येथें निळीकाळी व तांबडी शाई तयार करण्याचा

' राष्ट्रीय--कलाभुवन ' नांवाचा कारखाना आहे. ओगलेवाडी येथें कांचसामान व पितळी व टीनचे कंदील तयार करण्याचा मोठा कारखाना आहे. सुपनें येथें गंजीफाक तयार होतात. काले येथें गुरांचा बाजार बुधवारीं भरतो.

**किल्ले:**—वसंतगड व सदाशिवगड.

या तालुक्यांत एकंदर १०२ गांवें असून त्यांपैकीं ७४ खालसा व २८ इनाम आहेत. लोकसंख्या १२०७०६ असून प्रायमरी शाळा १२४ आहेत.

---

# पाठ २९ वा.

## पाटण तालुका.

कऱ्हाड तालुक्याचे पश्चिमेस हा तालुका आहे. सह्याद्रि व त्याचे फाटे या तालुक्यांत सर्वत्र पसरल्यामुळें सर्व भाग डोंगराळ आहे. तारळी, कोयना, मोरणा या नद्या यांतून वाहातात. नदी-कांठचा भाग व डोंगरांमधील सखल भाग यांत जमीन बरी आहे. पश्चिमेकडून येणारा पाऊस पुष्कळ पडतो व झाडी दाट आहे त्यामुळें पावसाळ्यांत हवा रोगट होते. डोंगराळ प्रदेशामुळें प्रशस्त रस्ते फार कमी आहेत. तांदूळ, शाळू, मुइमूग हीं मुख्य पिकें होतात. तारळ खोऱ्यांतील तांदूळ चवदार म्हणून प्रसिद्ध आहे.

पाटण हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार, फौजदार, रजिस्ट्रार यांच्या कचेऱ्या आहेत. तालुका लोकलबोर्डचें ऑफिस आहे. मनुष्यांकरतां दवाखाना आहे. येथें चिरमुरे होतात.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**--तारळें, पाटण, चाफळ, मल्हारपेठ, मारूल, चहुले व कुंभारगांव.

**देवस्थानें:**—चाफळ येथें श्रीरामाचें स्थान आहे. समर्थ राम-दासस्वामींनीं या ठिकाणीं श्रीरामाची स्थापना केलेली आहे.

येराड येथें एडोबाचें स्थान आहे. हें दैवत फार कडक आहे असें म्हणतात.

किल्ले:—बहिरवगड, गुणवंतगड व दातेगड.

देववाडी येथें मनुष्यांकरितां धर्मार्थ दवाखाना आहे.

या तालुक्यांत एकंदर २०३ गांवें असून १५५ खालसा व ८८ इनाम आहेत. लोकसंख्या ११२८६९ असून प्रायमरी शाळा ८४ आहेत.

---

## पाठ ३० वा.

### जावली तालुका व मालकमपेठ पेटा.

सातारा जिल्ह्याच्या वायव्य बाजूस जो अतिशय डोंगरांचा तालुका आहे तोच जावली तालुका होय. सह्याद्रीच्या रांगा या तालुक्यांत सर्वत्र पसरल्यामुळें तो फार डोंगराळ आहे. मोठमोठ्या दऱ्याखोऱ्यांची यांत रेलचेल आहे. या तालुक्यांतून कृष्णा, कुडाळी, वेण्णा, कोयना या नद्या उगम पावतात. नद्यांचा पूर्वप्रवाह या तालुक्यांत असल्यामुळें त्यांच्या कांठीं सुपीक जमिनी नाहींत. डोंगरामुळें सपाट जमिनी फार कमी आहेत. सर्व जिल्ह्यांत या तालुक्यामध्यें पाऊस जास्त पडतो. झाडी फार आहे, त्यामुळें पावसाळ्यांत हवा आरोग्यकारक असत नाहीं. उन्हाळा व थंडी या दिवसांत हवा फार उत्तम असते. तांदूळ हें यांतील मुख्य पीक होय. बटाटा, नाचणी, वरी, शाळू हीं पिकें होतात. उत्पन्न कमी म्हणून लोकांची सांपत्तिक स्थिति चांगली नाहीं.

सरकारी कामकाजास सोइचें पडावें म्हणून मालकमपेठ हा पेटा पाडला आहे.

मेढें हें या तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें मामलेदार,

फौजदार, रजिस्ट्रार यांच्या कचेऱ्या आहेत. तालुका लोकलबोर्डाचें ऑफिस आहे. येथें धर्मार्थ दवाखाना आहे.

मालकमपेठ हें मालकमपेठ पेट्यांचें मुख्य ठिकाण आहे. महालकरी, फौजदार यांच्या कचेऱ्या आहेत. येथें म्युनिसिपालिटी आहे. हें ठिकाण उंचावर असल्यामुळें युरोपियन लोक हवा खाण्यासाठीं येथें येतात. म्युनिसिपालिटीची सर्व व्यवस्था युरोपियनांच्या हातीं आहे. जवळच महाबळेश्वर हें ठिकाण आहे. येथील सृष्टिसौंदर्य, हवापाणी फार उत्तम आहे. येथूनच कृष्णानदी उगम पावते. ती ज्या ठिकाणाहून उगम पावते त्यास हिंदु लोक फार पवित्र मानितात. छत्रपति शिवाजीमहाराज यांचा प्रसिद्ध प्रतापगड किल्ला महाबळेश्वराजवळच आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—कुडाळ, मेढें, सायगांव, बामणोली तांबी, मांलकमपेठ.

म्हसवें येथें फार जुनाट असें वडाचें झाड आहे. त्याचा विस्तार ३।४ एकर जमिनीवर पसरला आहे.

**किल्ले:**—वासोटा व प्रतापगड.

या तालुक्यांत एकंदर २५२ गांवें असून १८१ खालसा व ७१ इनाम आहेत. लोकसंख्या ६७८४४ असून प्रायमरी शाळा ५२ आहेत.

---

# पाठ २१ वा.

## फलटण संस्थान.

सातारा जिल्ह्याच्या उत्तरेस जो पिवळा चौकोनी भाग दिसत आहे, तोच फलटण संस्थान होय. याचा विस्तार तालुक्याएवढा असून लोकसंख्या ६६३८३ आहे. उत्पन्न २ लाख रुपये आहे.

या संस्थानच्या दक्षिणसरहद्दीवर शंभू महादेवाच्या डोंगरांची रांग आहे. बाणगंगा ही नदी व इतर ओढे दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहातात, म्हणून या प्रदेशाचा उतार दक्षिणेकडून उत्तरेकडे आहे. प्रदेश सखल व सपाट असून जमीन चांगल्या प्रतीची आहे. पाऊस फार कमी व अनिश्चित पडतो म्हणून इकडे वरचेवर दुष्काळ पडत असत. पण हल्लीं निरानदीचा राईट बँक कॅनाल संस्थानच्या मध्यांतून पूर्वपश्चिम गेल्यामुळें बहुतेक सर्व जमिनीस पाटाचें पाणी मिळून तो चांगला सुपीक झाला आहे. बाजरी, शाळू हीं मुख्य पिकें होत.

**मार्गः**—वर्धाघाट–पंढरपूररस्ता, सातारा–बारामतीरस्ता, बेळगांव–पुणेंरस्ता, शिंगणापूर–फलटणरस्ता, हे सडकांचे मार्ग या संस्थानांतून गेले आहेत. शिवाय पश्चिम भागांतून रेलवेरस्ता गेला आहे. लोणंद हें स्टेशन या संस्थानांतील लोकांचें दळणवळणाचें मुख्य ठिकाण आहे.

**शिक्षणः**—मोठ्या व मध्यम वस्तीच्या गांवांत सरकारी प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत. ज्या खेडेगांवीं शाळा नाहींत त्या गांवीं मे० सकपाळसाहेब पोलीस इन्स्पेक्टर यांनीं मराठा विद्याप्रसारक समाजातर्फे खाजगी शाळा काढून शिक्षण देण्याचें कार्य सुरू केलें आहे.

**राज्यकारभारः**—हें संस्थान निंबाळकर या आडनांवाच्या मराठा राजाच्या ताब्यांत आहे, राजेसाहेबांनीं लोकनियुक्त कौन्सिल नुकतेंच स्थापन केलें आहे. राजेसाहेब व कौन्सिल संस्थानचा राज्यकारभार पाहतात. हल्लीं फलटणचे गादीवर श्रीमंत नानासाहेब निंबाळकर हे राजे आहेत. हे इंग्रज सरकारचे मांडलिक आहेत.

‘ फलटण ’ हें या संस्थानचें मुख्य ठिकाण आहे. येथें राजे-

साहेब राहतात. कौन्सिल व अधिकारी येथून राज्यकारभार चालवितात. येथें म्युनिसिपालिटी, दवाखाने, पोस्ट व तार ऑफिस, मराठी व इंग्रजी शिक्षणाच्या शाळा आहेत. श्रीरामाचें प्रसिद्ध देवस्थान आहे. मराठी राज्याच्या पूर्वींपासून हें ठिकाण निंबाळकर राजे यांची राजधानी आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—फलटण व तरडगांव हीं पोष्टाचीं व मोठीं गांवें आहेत. शिवाय वाठार, विडनी हीं मोठीं गांवें आहेत.

---

# पाठ ३२ वा.

## औंध संस्थान.

या संस्थानचा मुलूख एके ठिकाणीं नसून ठिकठिकाणीं पसरला आहे. सातारा जिल्ह्याच्या पूर्व बाजूस आटपाडी महाल म्हणून बराच मोठा भाग एके ठिकाणीं आहे. याशिवाय जिल्ह्यांत पिवळ्या रंगानें दाखविलेल्या गांवांपैकीं ज्यांखालीं औंध संस्थानापैकीं असें लिहिलें आहे, त्यांचा समावेश या संस्थानांत होतो. विजापूर जिल्ह्यांतही कांहीं प्रदेश आहे, त्यांचा गुणदाळ व कोटयाळ महालांत समावेश होतो. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं पांच महाल केले आहेत. आटपाडी, कापील, कुंडल, गुणदाळ व कोटयाळ हे पांच महाल होत. आटपाडी महालांत पाऊस अनियमित पडतो. वळिवाचा पाऊस बराच पडतो. जमीन माळरानाची आहे. बाजरी, शाळू, तूर, हरबरा हीं पिकें बरींच होतात. विहिरीचे पाण्यावर बागाईत पिकें करितात. राताळीं, खपली, व्हंडी हीं बागाईत पिकें होत. मेंढरें फार असल्यामुळें लोकर पुष्कळ व चांगल्या दर्जाची होते. घोंगडीं विणण्याचा धंदा बराच चालतो. कांहीं ठिकाणीं पासोड्या

व इतर खादीचें कापड विणतात. या संस्थानची लोकसंख्या ६५१४६ असून उत्पन्न साडेतीन लाख रुपये आहे.

मार्ग—मल्हारपेठ–पंढरपूर रस्ता व खानापूर–पंढरपूर रस्ता हे आटपाडी महालांतून जातात.

'औंध' हें या संस्थानचें मुख्य ठिकाण असून तें खटाव तालुक्यांत आहे. येथें संस्थानचे मुख्य मालक राहतात. या संस्थानचे मूळ संस्थापक परशुराम त्रिंबक किन्हईकर हे छत्रपति राजाराम महाराज यांचेवेळीं प्रसिद्धीस येऊन त्यांना 'प्रतिनिधी' हा किताब व जहागीर मिळाली. हल्लीं श्रीमंत बाळासाहेब हे प्रतिनिधी आहेत. पंतप्रतिनिधी व त्यांचें कौन्सिल मिळून संस्थानचा राज्यकारभार चालवितात. येथें दवाखाने, म्युनिसिपालिटी, मराठी व इंग्रजी शिक्षणाच्या शाळा, पोस्ट व तार ऑफिस हीं आहेत. येथें देवीचें प्रसिद्ध स्थान आहे. पौष पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. या यात्रेच्या वेळीं जनावरांचा मोठा बाजार भरतो. याशिवाय दर गुरुवारींही बाजार भरतो. पंतप्रतिनिधींनीं आपल्या संस्थानांत सक्तीचें मोफत शिक्षण सुरूं केलें आहे.

**मोठीं व पोस्टाचीं गांवें:**—औंध, आटपाडी, दिगंची, किन्हई व कुंडल.

**प्रसिद्ध ठिकाणें**—किन्हई येथें यमाई देवीचें देवस्थान आहे. येथें देवीची लस तयार करण्याचा कारखाना आहे. किर्लोस्करवाडी येथें लोखंडी नांगरांचा व इतर लोखंडी सामानाचा मोठा कारखाना आहे. ओगलेवाडी येथें कंदील व कांचसामान यांचा मोठा कारखाना आहे.

आरोग्य व एकंदरींत संस्थानची सुधारणा होण्याकडे पंत प्रतिनिधींचें फार लक्ष असून ते त्यांस अनुसरून शक्य तो प्रयत्न करीत आहेत

श्रीमंत उत्तम प्रतीचे चित्रकार असून यांनीं पुष्कळ चित्रें काढिलीं आहेत. प्रत्येक शाळेस चित्ररामायण हा ग्रंथ दिला आहे.


# पाठ ३२ वा.

## मराठी जिल्ह्यांची सामान्य माहिती. ( भाग १ ला )

तुम्हांस सातारा जिल्ह्याची माहिती मिळाली आहेच. आपल्या जिल्ह्यांत मराठ्यांची वस्ती जास्त आहे व लोक मुख्यत्वेंकरून मराठी भाषा बोलतात. आपल्या जिल्ह्याच्या आसपास असेच मराठ्यांची विशेष वस्ती असलेले व मराठी भाषा बोलणारे जिल्हे आहेत त्यांना ‘ मराठी जिल्हे ’ असें म्हणतात. पूर्वखानदेश, पश्चिमखानदेश, नाशीक, अहमदनगर, सोलापूर, पुणें, सातारा, ठाणें, कुलाबा व रत्नागिरी असे एकंदर दहा मराठी जिल्हे आहेत. जिल्ह्यांप्रमाणेंच मराठी संस्थानें आहेत. कोल्हापूर हें मोठें संस्थान असून जव्हार, जंजिरा, सावंतवाडी, भोर, फलटण, अक्कलकोट, औंध, मिरज, सांगली वगैरे लहान संस्थानें आहेत. संस्थानें व जिल्हे मिळून होणाऱ्या सर्व प्रदेशास ‘ महाराष्ट्र ’ असें म्हणतात.

मराठी जिल्ह्यांचा किंवा आपल्या महाराष्ट्राचा नकाशा नीट पहा. त्यांत आपल्या जिल्ह्याच्या पश्चिमेस जो दक्षिणोत्तर सह्य पर्वत आहे तोच महाराष्ट्रांत दक्षिणोत्तर पसरला असल्याचें दिसेल. घरामध्यें भिंत घातल्यानें त्याचे जसे दोन भाग होतात तसेच या पर्वतानें महाराष्ट्राचे दोन स्वाभाविक भाग झाले आहेत. पूर्वेकडील भागास देश म्हणतात व त्यांत पूर्व व पश्चिम खानदेश, नाशीक, अहमदनगर, सोलापूर, पुणें, सातारा हे सात जिल्हे आहेत. पश्चिमेकडील भागास कोंकण म्हणतात व त्यांत ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे तीन जिल्हे आहेत.

सह्याद्रि हा बराच उंच आहे व त्यावरील हवा थंड आहे. पश्चिमेकडे समुद्र जवळ असल्यामुळें कोंकणांत उतार फार आहे.


सातपुडा
सुरत
मुंबई
गोदावरी
भीमा
मराठी जिल्हे
उंच प्रदेश
सखल ,,

उतारामुळें नद्यांचे प्रवाह फार खळखळाटाचे आहेत. प्रदेश सखल असल्यामुळें कोंकणांतील हवा उष्ण आहे. समुद्रामुळें हवामानांत फारसा फरक पडत नाहीं. पूर्वबाजूस समुद्र लांब असल्यामुळें उतार बेताचा आहे. डोंगरांच्या रांगा मधून मधून पसरल्या आहेत. त्यांवर व सह्याद्रीवर पूर्वींच्या काळीं प्रसिद्ध असलेले डोंगरी किल्ले आहेत. उतार बेताचा म्हणून नद्यांचा प्रवाह संथ आहे. हवा साधारण उष्ण आहे.

पश्चिमेकडून येणारा पाऊस कोकणांत व सह्याद्रीवर पुष्कळ पडतो व देशावर आलेल्या ढगांत वाफ थोडी उरल्यामुळें पाऊस कमी पडतो. देशाच्या सर्व बाजूस वळिवाचा पाऊस बराच पडतो.

कोकणांतील नद्यांची लांबी कमी असल्यामुळें व प्रवाह जोराचा असल्यामुळें जमीन सुपीक नाहीं. तांबूस व खडकाळ जमीन सर्वत्र आहे देशावरील नद्यांची लांबी पुष्कळ असून प्रवाह संथ आहे. काळी व कसदार जमीन बरीच आहे. तापी, गोदावरी, भीमा, प्रवरा, निरा, कृष्णा या देशावरील मोठ्या नद्या होत. गोदावरी, प्रवरा, मुठा व निरा या नद्यांस तलाव बांधून व धरणें धरून शेतीस पाणी पुरविलें आहे. या पाटानें बरीच जमीन सुपीक झाली आहे.

---

# पाठ ३४ वा.

## मराठी जिल्ह्यांची सामान्य माहिती ( भाग २ रा. )

कोंकणांत पाऊस जास्त पडतो व हवा उष्ण असल्यामुळें 'तांदूळ' हें त्यांतील मुख्य पीक होय. वरी, नाचणी, पावटा हींही पिकें होतात. समुद्रकिनाऱ्यावर नारळ व सुपारी यांचें मोठें

उत्पन्न आहे. मीठ पुष्कळ तयार करतात. याशिवाय समुद्रांतील मासे व जंगलांतील लाकूड हीं मिळतात. देशावरील जमीन कसदार आहे. पाऊस बेताचा पडतो त्यामुळें ज्वारी, बाजरी, कापूस हीं मुख्य पिकें होतात. नद्यांच्या पाटावर व विहिरीचे पाण्यावर ऊस, हळद, मिरची, फळफळावळ, भाजीपाला, गहू हीं पिकें होतात.

सह्याद्रीचे जंगलांत वाघ, रानडुकरें हे हिंस्र प्राणी आहेत. सपाट जमिनीवर हरणें, कोल्हे, लांडगे हे पशु आढळतात. बैल व म्हशी सर्वत्र आहेत. कांहीं ठिकाणीं मेंढरें आहेत.

दळणवळणाचीं साधनें कोंकणापेक्षां देशावर चांगलीं आहेत. मुंबईपासून जो आगगाडीचा रस्ता निघतो त्याचे कल्याणजवळ दोन फाटे होतात. एक नाशीक, भुसावळवरून जबलपुराकडे जातो व दुसरा पुणें सोलापुरावरून मद्रासेस जातो. याशिवाय पुण्यापासून बेळगांवाकडे, दौंडपासून मनमाडकडे व बारामतीकडे, बार्शीपासून पंढरपूर, मिरज व लातूर इकडे आगगाडीच्या रस्त्याचे फाटे गेले आहेत. देशावर बैलगाडीच्या पक्क्या सडका सर्व भागांत आहेत. मुंबईपासून पुणें, सातान्यावरून मद्रासकडे व मुंबईहून दिल्लीकडे जाणारे मोठे रस्ते आहेत. कोंकणांत समुद्रकिनाऱ्यानें आगबोटी व होड्या यांनीं दळणवळण चालतें.

शेती करणें हा महाराष्ट्रांतला प्रमुख धंदा आहे. शेतीशिवाय मासे मारणें, मुंबईतील गिरण्यांत काम करणें, सरकारी नोकऱ्या करणें, हें कोंकणी लोकांचे प्रमुख धंदे आहेत. देशावर विणकाम, नोकरी, व्यापार, मजुरी व इतर धंदे करणारे लोक आहेत. धुळें, जळगांव, येवलें, संगमनेर, अहमदनगर, सोलापूर, मुंबई हीं शहरें विणकामाविषयीं प्रसिद्ध आहेत. नाशीक, पुणें, सांगली येथें तांब्यापितळेचीं भांडीं होतात.

सातारा जिल्ह्यांत लोखंडी औतांचा व कांचसामानाचा व पुण्या-जवळ मुंढव्यास कागदांचा कारखाना आहे.

देशावरील धान्य, घोंगडीं व तंबाखू हीं कोंकणांत जातात व कांहीं धान्य परदेशीं रवाना होतें. तसेंच लोखंडी औतें, कांच-सामान, कंदील हे परठिकाणीं रवाना होतात. कोंकणांतून तांदूळ, मीठ, नारळ, सुपारी, मसाला देशावर येतो. यांतील कांहीं माल व कापूस, धान्य हीं परदेशीं पाठविलीं जातात. परदेशांहून कापड, साखर, राकेल, यंत्रें, आगपेट्या, स्टेशनरी, मोटारी वगैरे माल येतो.

सह्याद्रीचे आसपासचे व कोंकणांतील लोक शरीरानें सडपातळ असून फार काटक आहेत. प्रदेश कमी पिकाऊ म्हणून लोकांची सांपत्तिक स्थिति बेताची आहे. कोंकणांतील लोक उद्योगी व व्यवस्थेनें आणि काटकसरीनें संसार करणारे आहेत. देशावरील लोकांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. शरीरयष्टी धडधाकट असून काटकपणा कमी आहे. लोकांना उद्योगाची आवड कमी असून संसारांत व्यवस्थितपणा व काटकसर कमी आहे.

मुंबई हें मोठें बंदर असून त्याचा परदेशाशीं मोठा व्यापार चालतो. येथील वस्ती सुमारें बारा लाख असून तें महाराष्ट्रांतील सर्वांत मोठें शहर आहे. हें मुंबई इलाख्याची राजधानी आहे. हिंदु, पार्शी, मुसलमान, युरोपियन वगैरे सर्व प्रकारच्या लोकांची येथें वस्ती आहे. मुंबईमधील मजुरांमध्यें हिंदूंचा भरणा फार आहे. पार्शी, मुसलमान व युरोपियन हे लोक मोठे व्यापारी आहेत.

पुणें विद्या व चळवळ यांविषयीं प्रसिद्ध आहे. कोणतीही चळवळ या ठिकाणीं सुरू होते व जोराला लागते.

कोल्हापूर, सातारा, पुणें या भागांत सत्यसमाजाची चळवळ जोरांत आहे. बाकीचा भाग देवभोळा व पुराणप्रिय आहे.

कोल्हापूर हें महाराष्ट्रांतील सर्वांत मोठें संस्थान आहे. तें छत्रपति शिवाजी महाराज यांच्या वंशजांचे ताब्यांत आहे. इतर संस्थानें छत्रपतींच्या सरदारांच्या वंशजांच्या ताब्यांत आहे.

# परिशिष्ट.

## आपल्या जिल्ह्यांतील विशेष गोष्टी

[ लेखकानें आपल्या माहितीप्रमाणें खालील माहिती दिली आहे. कांहीं माहिती देण्याची राहिली असल्यास तें लेखकाचें अज्ञान आहे. सुज्ञांनीं कमी असलेली माहिती कळविण्याची कृपा करावी. ]

**१ साप्ताहिक वर्तमानपत्रें**—ऐक्य, शुभसूचक, प्रकाश, समर्थ हीं साताऱ्याहून निघणारीं; सातारा, भारतमाता, भारतवृत्त हीं इसलामपुराहून निघणारीं, खबरदार, अभ्युदय, सारथी हीं कऱ्हाडहून निघणारीं; सत्यवादी कुपवाडहून निघणारें. अशीं एकंदर १० वर्तमानपत्रें निघतात.

**२ मासिकें**—पुरुषार्थ ( औंध ), किर्लोस्कर खबर ( किर्लोस्करवाडी ), स्वकुळसाळीविजय ( कऱ्हाड ), मधुकर ( कोरेगांव ), ब्राह्मणमासिकपत्रिका ( इसलामपूर ).

**३ लेखक**—नामदार भास्करराव जाधव, श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, रा. नारायण हरी आपटे, रा. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, रा. वे. शा. संपन्न महादेवशास्त्री दिवेकर, रा. शंकरराव किर्लोस्कर, रा. वाग्भट नारायण देशपांडे, रा. दा. ना. मुंडले, रा. सदाशिव खंडो आळतेकर, श्रीमती कमलाबाई देशपांडे, रा. कृष्णाजी भाऊराव बाबर, रा. ना. रा. केळकर, रा. मोहिनीराज मुळे, रा. भाऊसाहेब पवार.

**४ कवि**—रा. नाना रावजी येडेकर ऊर्फ शिवतनय, धोंडी नाना शिंदे ऊर्फ अरविंद, रा. मुजुमदार ऊर्फ साधुदास, रा. शंकर केशव कानिटकर ऊर्फ गिरीश, रा. यशवंत, श्रीमती कमलाबाई देशपांडे.

**५ वक्ते**—नामदार भास्करराव जाधव, वे. शा. संपन्न महादेवशास्त्री दिवेकर, रा. सदाशिव खंडो अळतेकर, रा. सोमण वकील, रा. दादासाहेब करंदीकर वकील, रा. भाऊराव पायगौंडा पाटील, रा. केशवराव विचारे.

**६ पुढारी**—(१) ब्राह्मणेतरपक्ष–नामदार भास्करराव जाधव, रावसाहेब आढाव, खानबहादूर कूपर, रा. भाऊसाहेब कुदळे, रा. भाऊराव पायगौंडा पाटील, रा. केशवराव विचारे, रा. धोंडजी पाटील, रा. आनंदराव दुधे.

२ **कांग्रेसपक्ष ( राष्ट्रीयपक्ष )** रा. सोमण, रा. आळतेकर, आमदार लक्ष्मणराव देशपांडे, रा. पंढरीनाथ घाणेकर. रा. दादासाहेब करंदीकर, रा. कौजलगी.

३ **प्रागतिकपक्ष**–रावबहादूर काळे, रा. वा. ना. देशपांडे, रा. गोविंराव रानडे.

७ **कारखानदार**–रा. लक्ष्मणराव किर्लोस्कर, रा. गुरुनाथराव ओगले खानबहादूर कूपर, रा. फडके ( कऱ्हाड ), रा. पराडकर (किन्हई), खानसाहेब यूसफभाई.

८ **चित्रकार**––श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि, रा. डी. पी. गोखले, रा. शंकरराव किर्लोस्कर.

९ **कीर्तनकार**—श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, रा. तात्या चोपडे, रा. जाधव (औंध), रा. महादेव रंगनाथ कुलकर्णी ऊर्फ पिलुबुवा ( वडूज ), डॉक्टर पटवर्धन, वे. शा. स. महादेवशास्त्री दिवेकर, रा. काशिनाथबुवा कुरोलीकर.

१० **गायनवादनपटु**—रा. कृष्णाबुवा पवार बागणीकर, रा. बगाडे (सातारा). रा. खारगे (कुंडल), रा. बंडोपंत देशपांडे ( कोळें ), रा. भागवत व पंढरीनाथ (हणमरवाडी- मसूर), रा. एकनाथ (हेळगांव पाडळी), रा. विठोबा म्होपरे, रा. शंकर अंताजी कूळकर्णी ( बागणी ), रा. शंकर रघुनाथ कुलकर्णी, (फिडल वाजविणार ऐतवडें बुद्रुक) रा. दाजी गुरव, रा. बटयाजी (राहिमतपूर) रा. मारुती शेटे (मसूर), रा. बाबूराव जोशी (कुरोली, उत्तम पेटी वाजविणें.)

११ **पाहिलवान**—रा. पांडु पाटील शिराळकर, रा. मोहिद्दीन मांगलेकर, रा. खाशाबा सासपडेकर, रा. साहेबराव कडेपूकर रा. पांडू कदम रेठरेकर, रा. हन्यापा उंटवाले दुधगांवकर, रा. दगडू न्हावी शिरगांवकर रा. बाबूराव कोरेगांवकर, रा. दादू कुरोलीकर, रा. बाळू देसाई कामेरीकर, रा. पांडू यल्लमरवाडीकर, रा. नानाभाऊ मास्तर कामेरीकर.

४०४६

REFBK-0004046

REFBK-0004046